। लातूर । वर्ष ३४ वे । अंक २०३ वा । मंगळवार, दिनांक ०४ नोव्हेंबर २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १ रू. RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# मंत्रिमंडळ बैठकीत २१ महत्त्वाचे निर्णय

## महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून गंभीर आजारासाठी १० लाख मिळणार

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची कॅबिनेट बैठक मंगळवारी संपन्न झाली. मंगळवारच्या बैठकीत काही मुद्द्यांवरुन चांगलीच खडाजंगी झाल्याची माहिती आहे. मात्र, आजच्या बैठकीत २१ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामध्ये, सार्वजनिक आरोग्य विभागाने महत्त्वाचा आणि मोठा निर्णय घेतला आहे. महात्मा फुले जनआरोग्य योजनेत विविध प्रकारच्या २४०० आजारांसाठी मान्यता देण्यात आली असून २३९९ आजारांसाठी ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार होणार आहेत. तर, ज्या काही गंभीर आजारांसाठी अधिकचा खर्च होत आहे, त्यात १० लाख रुपये देण्याचा निर्णयही शासनाने घेतल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

मंत्रिमंडळ बैठकीत पुन्हा मंत्र्यांनी प्रशासनाला धारेवर धरले, अजूनही पीडित शेतकऱ्यांना हवी तशी आणि हव्या त्या वेगाने मदत दिली जात नसल्याने अनेक वरिष्ठ मंत्री नाराज असल्याचे पाहायला मिळाले. शिवसेना आणि भाजपच्या मंत्र्यांनी कॅबिनेट बैठकीत नाराजी व्यक्त केली. मागील कॅबिनेटमध्ये देखील अशीच नाराजी व्यक्त केल्याने मुख्यमंत्री यांनी प्रशासनाला खडसावले होते. मात्र, आजच्या कॅबिनेटमध्ये पुन्हा मदत पोहोचली नसल्याची तक्रार काही मंत्र्यांनी केली, फक्त मराठवाड्यात नाही तर कोकणात देखील भात पिकाचे मोठे नुकसान झाल्याचे कोकणातील सेना-भाजपच्या मंत्र्यांनी सांगितले, तिथे



देखील मदत देण्याचे प्रशासनाला निर्देश बैठकीत देण्यात आले आहेत.

**मंत्रिमंडळ बैठकीतील २१ निर्णय**

**सार्वजनिक बांधकाम विभाग)**

विरार ते अलिबाग बहुउद्देशिय वाहतूक मार्गिका प्रकल्पाच्या कर्जास शासन हमी देण्यास मान्यता. हुडको कडून घेण्यात येणारे हे कर्ज महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ भूसंपादनासाठी येणाऱ्या खर्चासाठी वापरणार आहे.

**(उच्च व तंत्रशिक्षण विभाग)**

नागपूर येथील लक्ष्मी नारायण अभिनव तंत्रज्ञान (एलआयटी) विद्यापीठ, नागपूर विद्यापीठास निधी देण्यास मान्यता. सन २०२५-२०२६ ते सन २०२९-२०३० या कालावधीकरीता दरवर्षी ७ कोटी रुपयांचा निधी चार हप्त्यात वितरीत करण्यात येणार. संस्था १९४२ मध्ये स्थापन झालेली ही संस्था रसायन तंत्रज्ञान क्षेत्रात नावाजलेली संस्था.

**(महसूल विभाग)**

सोलापूर जिल्ह्यातील मौजे कुंभारी ( ता. दक्षिण सोलापूर) येथील असंघटित कामगारांच्या प्रधान मंत्री आवास योजने अंतर्गत उभारण्यात येणाऱ्या ३० हजार घरांच्या गृहप्रकल्पास अनर्जित रक्कम, नजराणा रक्कम व अकृषिक करातून सवलत देण्यास मान्यता.

**(महसूल विभाग)**

वाशिम जिल्ह्यातील मौजे वाईगोळ ( ता.मानोरा) येथील मधील १.५२ हे.आर. जागा ग्रामपंचायत, वाईगौळ यांना भक्त निवास व यात्रेकरूंसाठीच्या सोयी-सुविधा उभारण्याकरिता विनामूल्य देण्यास मान्यता.

**(विधि व न्याय विभाग)**

पुणे जिल्ह्यात घोडनदी (शिरुर) येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय व दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर तसेच शासकीय अभियोक्ता कार्यालय यांची स्थापना होणार. त्यासाठी आवश्यक पद निर्मितीस मान्यता.

**(विधि व न्याय विभाग)**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण येथे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालय होणार. त्यासाठी आवश्यक न्यायीक अधिकारी व कर्मचाऱ्यांची पद निर्मितीस मान्यता.

**(वित्त विभाग)**

राज्य मालमत्ता पुनर्रचना कंपनी MAHA ARC LIMITED बंद करण्यास मंजुरी. केंद्राच्या नॅशनल अँसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनीची स्थापन केली होती, त्याच धर्तीवर राज्य कंपनीची स्थापना सप्टेंबर २०२२ मध्ये स्थापन करण्यात आली होती. भारतीय रिझर्व्ह बँकेने २०२३ मध्ये या कंपनीला परवाना नाकारल्याने, कायदेशीर दृष्ट्या या कंपनीला कामकाज पाहणे शक्य नसल्याने, कंपनी बंद करण्याचा निर्णय.

**(ग्राम विकास विभाग)**

ग्रामपंचायत कर्मचा-यांचे वेतन देण्यासाठी असलेल्या कर वसुलीच्या अटीत सुधारणा. कर्मचाऱ्यांना दिलासा.

**(मत्स्यव्यवसाय विभाग)**

मत्स्यव्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्यात आल्याने मच्छिमार, मत्स्यसंवर्धक व मत्स्यकास्तकारांना बँकाकडून देण्यात येणाऱ्या अल्प मुदतीच्या खेळत्या भांडवलाच्या कर्जावर ४ टक्के व्याज परतावा देण्यास मान्यता.

**(अल्पसंख्याक विकास विभाग)**

हिंद-की-चादर श्री. गुरुतेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० वी शहीदी समागम शताब्दी कार्यक्रमास आवश्यक निधीस मान्यता. नांदेड, नागपूर आणि रायगड जिल्ह्यांतर्गत राज्यभरातील विविध ठिकाणी होणाऱ्या कार्यक्रमांच्या आयोजनासाठी ९४ कोटी ३५ लाख ६४ हजार रुपयांच्या निधीच्या तरतुदीस मान्यता.

**(सामान्य प्रशासन विभाग)**

प्रस्तावित महाराष्ट्र जनविश्वास अध्यादेश, २०२५ मधील तरतुदीमधील सुधारणांना मान्यता.

**(महसूल विभाग)**

जमीन मुंबई उपनगर जिल्हातील मौजे वांद्रे ( ता. अंधेरी) येथील ३० वर्ष कालावधीसाठी एक रुपया नाममाफ वार्षिक भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या ६४८ चौ.मी. शासकीय जमिनीसमोरील ३९५ चौ.मी. भुखंडावर आवश्यक अन्य सोयी-सुविधा पुरविण्यास मान्यता.

**(महसूल विभाग)**

अकृषिक कर आकारणी तसेच जमिनीच्या अकृषिक वापराच्या परवानगी व सनदेबाबतच्या तरतुदींमधील सुधारणांना मान्यता. त्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये सुधारणा करण्यात येणार

**(सार्वजनिक आरोग्य विभाग)**

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या विस्तारीत योजनेअंतर्गत आयुष्मान कार्ड निर्माण व वितरण करणाऱ्या क्षेत्रिय स्तरावरील कर्मचा-यांच्या (त्रीपीं डळपश थेीज्ञशी) मानधनात वाढ करण्यास मंजुरी.

**(सार्वजनिक आरोग्य विभाग)**

राज्यातील नागरिकांना आरोग्य सुविधा आणि चांगले उपचार व्हावेत यासाठी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत उपचारांच्या यादीत सुधारणा करण्यास मान्यता.

**(सार्वजनिक आरोग्य विभाग)**

राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत शहरी आरोग्य आयुक्तालय स्थापन करणार. आरोग्य सुविधांचे विकेंद्रीकरणामुळे नागरिकांना दिलासा.

**(नियोजन विभाग)**

परशुराम आर्थिक विकास महामंडळ, वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ व श्री वासवी कन्यका आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांना मंजुरी.

**(वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग)**

बारामती येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी सहयोगी प्राध्यापकांची पाच पदे निर्माण करण्यास मान्यता. त्यासाठी आवश्यक खर्चाच्या तरतुदीस मंजुरी.

**(नगरविकास विभाग)**

वर्धा शहरातील रामनगर येथील भाडेपट्ट्याने दिलेल्या भूखंडधारकाला निवासी भूखंड कायमस्वरुपी मालकी हक्काने देण्यास मंजुरी

**(सार्वजनिक आरोग्य विभाग)**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियमित पदावर समायोजन करण्याच्या निर्णयात दुरुस्तीस मान्यता. अभियानात १४ मार्च २०२४ रोजी दहा वर्ष सेवा पूर्ण झालेल्या कंत्राटी कर्चाऱ्यांचे समकक्ष पदाव समायोजन. सेवा प्रवेश नियमांत दुरूस्ती न एक वेळची बाब म्हणून समायोजन केले जाणार. सार्वनजिक आरोगय विभागातील पदांबरोबर, ग्रामविकास विभागामार्फत भरण्यात येणारी आरोग्य सेवेतील रिक्त पदांबाबतचा निर्णय.

**(उच्च व तंत्रशिक्षण विभाग)**

चंद्रपूर जिल्हयातील मुल येथे ३०० प्रवेश क्षमतेचे नवीन पदविका अभियांत्रिकी शासकीय तंत्रनिकेतन सुरु करण्यात येणार. त्यासाठी आवश्यक ३९ शिक्षक व ४२ शिक्षकेतर पदांना व त्यासाठीच्या खर्चाच्या तरतुदीस मान्यता.

## पाकिस्तानच्या सुप्रीम कोर्टात मोठा स्फोट! इस्लामाबादमध्ये खळबळ; बेसमेंटमध्ये झालेल्या ब्लास्टने इमारतीला हादरवले

**इस्लामाबाद/वृत्तसंस्था :** पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद येथील सर्वोच्च न्यायालयाच्या इमारतीत एक मोठा स्फोट झाला आहे. कोर्टाच्या बेसमेंट भागात हा स्फोट झाल्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे संपूर्ण इमारतीला हादरा बसला असून, मोठ्या नुकसानीची भीती व्यक्त केली जात आहे.




स्फोट इतका भीषण होता की बेसमेंटमधील वस्तूंचे तुकडे होऊन ते वरच्या मजल्यापर्यंत उडाले. या घटनेची माहिती मिळताच सुरक्षा दलांनी तातडीने परिसर सील केला आहे. स्फोटाचे नेमके स्वरूप काय होते आणि यामागे घातपाताचे कारण आहे की अन्य कोणते, याबाबतची माहिती अद्याप स्पष्ट झालेली नाही. या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली आहे की नाही, याबद्दलची ताजी आकडेवारी प्रतीक्षेत आहे. सुरक्षा यंत्रणा आणि पोलिस घटनास्थळी दाखल झाले असून, स्फोटाच्या कारणांची आणि संभाव्य नुकसानीची चौकशी सुरू आहे. संवेदनशील भागात ही घटना घडल्यामुळे इस्लामाबादमधील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

## २०४७ ला स्वातंत्र्याचा शतक महोत्सव साजरा करताना भारत एक विकसित देश असेल : अॅड. आशिष शेलार

**लातूर/प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम व कुशल नेतृत्वात भारत प्रगतीच्या दिशेने मार्गोत्क्रमण करत आहे. त्यामुळे ज्यावेळी १५ ऑगस्ट २०४७ साली आपण आपल्या देशाचा शतक महोत्सव साजरा करताना भारत एक विकसित देश म्हणून जगासमोर आलेला असेल असे प्रतिपादन राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक मंत्री अॅड. आशिष शेलार यांनी केले.

लातूरच्या केशवराज विद्यालयात मंगळवारी सकाळी वैकुंठ चतुर्दशीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद्भगवद्गीता सामूहिक पठण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यासाठी अॅड. शेलार यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, भारतीय शिक्षण प्रसारक संस्था केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, संजय गुरव, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, स्थानिक




समन्वय समितीचे कार्यवाह शैलेश कुलकर्णी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी अॅड. आशिष शेलार यांच्या समोर श्रीमदभगवद्गीतेच्या १२ व्या आणि १५ व्या अध्यायाचे सामूहिक पठण केले. केशवराज विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी अशा प्रकारचा अभिनव उपक्रम राबविण्यात आल्याबद्दल राज्याचा सांस्कृतिक मंत्री या नात्याने शासनाच्या वतीने सगळ्यांचे धन्यवाद व्यक्त करतो असे सांगून अॅड. आशिष शेलार पुढे म्हणाले की, गुरुजन आणि आई - वडील यांच्याकडून मिळालेल्या संस्काराने विद्यार्थी समृद्ध बनतात. संस्कार हे छोट्या छोट्या गोष्टीतून घडत असतात. आजचे जग माहिती-तंत्रज्ञानाचे आहे. त्यामुळे विज्ञानाची भाषा शिकण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या संस्काराची वीण मजबूत असणे आवश्यक आहे. पंतप्रधान मोदींनी श्रीमद्भगवद्गीता हा राष्ट्रीय ग्रंथ म्हणून घोषित केला आहे. आज आपण केशवराजमध्ये विद्यार्थ्यांचे सामूहिक श्रीमदभग्वदगीता पठण ऐकून उद्याची पिढी, उद्याचा भारत कसा असेल हे बघायचे असेल तर लातूरच्या केशवराज विद्यालयात जाऊन बघा, असे प्रत्येकाला आवर्जून सांगणार असल्याचे त्यांनी नमूद केले. वंदेमातरम गीताला १५० वर्षे पूर्ण होत असल्याबद्दल राज्य शासनाच्या वतीने एक विशेष उपक्रम राबविण्यात येणार असल्याचेही अॅड. आशिष शेलार यांनी सांगितले. यावेळी आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रवीण सरदेशमुख यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी विद्यालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. मागच्या तीन वर्षांपासून विद्यालयात श्रीमदभग्वदगीता पठणाचा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे सांगून केशवराज विद्यालय हे मराठवाड्यातील गुणवंतांची खाण असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन विद्यालयाच्या पर्यवेक्षिका राजश्री कुलकर्णी यांनी केले. संगीत शिक्षक संतोष बीडकर यांच्या संपूर्ण वंदे मातरम् ने कार्यक्रमाची सांगता झाली. याप्रसंगी मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, रेनीसन्स सीबीएसई स्कूल शालेय समितीचे अध्यक्ष डॉ. मनोज शिरूरे, केशवराज उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विभाग प्रमुख रेखा पुरी, केशवराज प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी हेंडगे, केशव शिशु वाटिका प्रधानाचार्या अवंती कुलकर्णी, संपत पाटील, सुधीर धुतेकर यांसह मान्यवरांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, राम जोशी, धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी, सहप्रमुख मीरा चामवाड, शैला कुलकर्णी, कांचन तोडकर व व्यवस्थेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**BCCI कडून महिला संघाला ५१ कोटीचे बक्षीस...**



## चिमटा दयाचा

**मुख्य रस्त्यावरील दुकानदाराने व्यापला सरकारी रस्ता ! कडक निर्बंध नसल्याने वापरला जातो बिनधास्त रस्ता !!**

## औसा किल्ला होणार पर्यटनाचे नवे आकर्षण केंद्र – संवर्धनाच्या कामांना गती देणार : सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड. आशिष शेलार

**औसा/प्रतिनिधी :** ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार असलेल्या औसा किल्ल्याच्या संवर्धनाच्या कामांना आता गती मिळणार आहे, असे राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड. आशिष शेलार यांनी सांगितले. त्यांनी सोमवारी औसा किल्ल्याची पाहणी करून परिसरातील विकास कामांचा आढावा घेतला आणि लवकरच पर्यटकांसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली.

या पाहणीदरम्यान आमदार अभिमन्यू पवार, पुरातत्व विभागाचे संचालक तेजस गर्गे, औसा-रेणापूरचे उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार घनश्याम अडसूळ, पुरातत्व विभागाचे सहायक संचालक अमोल गोटे आणि औसा नगरपालिकेचे मुख्याधिकारी मंगेश शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.मंत्री शेलार म्हणाले की, औसा किल्ल्याच्या डागडुजी आणि संरक्षणासाठी आवश्यक कामांचा प्रस्ताव तातडीने सादर करण्यात यावा. मंजूर कामांना गती देऊन लवकरात लवकर मंजुरी प्रक्रिया पूर्ण केली जाईल.





किल्ल्यातील अतिक्रमण हटवताना येथील नागरिकांना पर्यायी घरे देण्यासाठी आवास योजनेचा प्रस्ताव तयार करावा. तसेच पर्यटकांसाठी 'साऊंड अँड लाईट शो'च्या माध्यमातून औसा किल्ल्याचा गौरवशाली इतिहास दाखविण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल.मंत्री शेलार यांनी पुढे सांगितले की, औसा किल्ला हा ऐतिहासिक वारसा असलेला पुरातन किल्ला असून, याचे संवर्धन झाल्यास हा भाग एक उत्कृष्ट पर्यटन स्थळ म्हणून विकसित होईल.

यावेळी आमदार अभिमन्यू पवार म्हणाले, किल्ल्यातील काही घरांचे अतिक्रमण असल्याने विकास कामांना अडथळा येतो. संबंधित कुटुंबांना आवास योजनेतून घरे उपलब्ध करून दिल्यास जागा मोकळी होईल आणि संवर्धनाला वेग येईल. त्याचबरोबर खरोसा येथील प्राचीन लेण्यांचेही संवर्धन करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली.पुरातत्व विभागाचे संचालक तेजस गर्गे आणि सहायक संचालक अमोल गोटे यांनी औसा किल्ल्याच्या दुरुस्तीच्या कामांची सद्यस्थिती व ऐतिहासिक पार्श्वभूमीची माहिती यावेळी सविस्तर दिली.औसा किल्ल्याच्या पुनरुत्थानामुळे औसा शहराला नव्या पर्यटन नकाशावर स्थान मिळणार असून, येत्या काही महिन्यांत संवर्धन व विकास कामांना प्रत्यक्ष गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## मांजरा साखर कारखान्याचा ३९ वा बॉयलर अग्नी प्रदीपन व ऊस गळीत हंगामाचा दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते शुक्रवारी शुभारंभ

**लातूर/प्रतिनिधी :** राज्यातील साखर कारखानदारीत नावलौकिक असलेल्या मराठवाड्यातील सहकारी साखर कारखानदारीत उस उत्पादक शेतकऱ्यांना सर्वाधिक ऊसाला भाव देणाऱ्या विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा सहकारी साखर कारखान्याचा ३९ वा बॉयलर अग्नी प्रदीपन व ऊस गळीत हंगामाचा शुभारंभ ७ नोव्हेंबर शुक्रवारी सकाळीं ११ वाजता राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी तथा कारखान्याचे चेअरमन दिलीपराव देशमुख साहेब यांच्या हस्ते व राज्याचे माजी वैधकिय शिक्षण मंत्री तथा आमदार अमित विलासरावजी देशमुख, माजी आमदार तथा लातूर जिल्हा बँकेचे चेअरमन धीरज विलासरावजी देशमुख व विविध मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे याबाबत कारखाना प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.



या ३९ व्या बॉयलर अग्नी प्रदिपण व ऊस गळीत हंगाम कार्यक्रमास सभासद, ऊस उत्पादक,हितचिंतक , यांनी उपस्थित राहावे असे आवाहन विकासात्मक विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे व्हॉईस चेअरमन अशोक काळे, कार्यकारी संचालक पंडित देसाई व सन्माननीय संचालक मंडळ यांनी केले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## मुंबईतील 'सत्याच्या मोर्चाने' लक्ष वेधले

राज्यातील विरोधी पक्षाने निवडणुकीतील काही प्रकार चव्हाट्यावर मांडण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी मोर्चाचे आयोजन केले होते. मुंबईच्या रस्त्यावर १ नोव्हेंबर निवडणूक आयोगाच्या विरोधात महाविकास आघाडी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांनी संयुक्तपणे काढलेला 'सत्याचा मोर्चा' आता आयोजकांच्या अडचणी वाढवणारा ठरला आहे. पोलिसांनी या मोर्चाला औपचारिक परवानगी नाकारली असतानाही, प्रतिबंधात्मक आदेशांचे उल्लंघन करून आणि बेकायदेशीरपणे सभा घेतल्याबद्दल मुंबई पोलिसांनी या मोर्चाच्या आयोजकांवर कठोर कारवाई केली असून, त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वास्तविक मतदार याद्यांमधील कथित घोळ आणि दुबार मतदारांच्या मुद्द्यावरून महाविकास आघाडी आणि मनसेच्यावतीने निवडणूक आयोगाच्या विरोधात शनिवारी मुंबईत मोर्चा काढण्याची घोषणा केली होती. या मोर्चाला सत्याचा मोर्चा असे नाव देण्यात आले होते. मात्र, पोलिसांनी या मोर्चाला परवानगी नाकारली होती. यापूर्वी झालेल्या मराठा आंदोलनावेळी सर्वसामान्यांना झालेल्या त्रासामुळे आणि उच्च न्यायालयाच्या नव्या मार्गदर्शक तत्त्वांमुळे पोलीस परवानगी देण्यास टाळाटाळ करत असल्याचे बोलले जात होते. परवानगी नाकारल्यानंतरही मोर्चा काढल्यास कायदेशील कारवाई केली जाईल, अशा सूचना पोलिसांकडून देण्यात आल्या होत्या. पोलिसांनी दिलेल्या सूचनेनंतरही महाविकास आघाडी आणि मनसेने संयुक्तरीत्या मोर्चा काढल्याने पोलिसांनी आता आयोजकांविरुद्ध कारवाईचा बडगा उगारला आहे. पोलिसांनी आयोजकांवर बेकायदेशीर सभा आयोजित करणे आणि प्रतिबंधात्मक आदेशांचे उल्लंघन करणे या आरोपांखाली गुन्हा दाखल केला आहे. यामुळे ऐन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. दरम्यान, सत्याचा मोर्चात विरोधी पक्षांनी जोरदार शक्तिप्रदर्शन केले. उद्धव ठाकरे, राज ठाकरे आणि शरद पवार यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर गंभीर आरोप केले. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी तर थेट दुबार मतदारांचे पुरावे सादर करत, निवडणुका एक वर्षासाठी पुढे ढकलण्यात याव्या आणि या दरम्यान मतदार याद्यांमध्ये संपूर्ण दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी केली. या मोर्चात काँग्रेस आणि इतर मित्रपक्षांचेही मोठे नेते सहभागी झाले होते. दुसरीकडे, महाविकास आघाडी आणि मनसेच्या या संयुक्त आंदोलनाला भाजपने तीव्र विरोध दर्शवला. भाजपने याला 'फेक नरेटिव्ह' आणि 'नौटंकी' म्हणत याचवेळी 'मूक आंदोलन' आयोजित केले. भाजप नेत्यांनी थेट आरोप केला की, जिंकलो की लोकशाही आणि हरलो की मतचोरी, ही विरोधकांची जुनी भूमिका आहे. भाजपने महाविकास आघाडीच्या या कृतीला 'असत्याचा फॅशन शो' असे संबोधले. मात्र, त्याचवेळी त्यांनी मतदार याद्यांमध्ये दुरुस्तीची गरज असल्याचे अप्रत्यक्षपणे मान्य केले. आपल्या देशात लोकशाही आहे. अशा स्थितीत आरोप होणे योग्य नाही. काही यात गडबड किंवा घोटाळा दिसून येत असेल तर त्या जनतेसमोर आणला पाहिजेत. त्याच प्रमाणे राज ठाकरे यांनी केलेले वक्तव्याचा विचार केला पाहिजे. निवडणुक आयोग तसे पाहिले तर काटेकोरपने कामकाज चालविते. आदेशाचा भंग कोणी करीत असेल तर त्याचा बंदोबस्त करते. मुळात लोकशाही अबाधित राहावी याचा विचार केला जातो. लोकशाहीत काही चुका होत असतील तर त्या लोकशाही मार्गानेच सोडविल्या पाहिजेत. याला जनतेचा पाठींबा मिळाला पाहिजे. जर राजकिय पक्ष भांडवल करीत असतील तर ते योग्य ठरणारे नाही. लोकशाहीत मतदार हा राजा समजला जातो. त्याच्या हक्काच कोणी हीराहुन घेत असेल तर ते चालणार नाही. मुळात आज जेष्ट नेते शरद पवार, उद्धव ठाकरे व राज ठाकरे यांची प्रतिमा या मोर्चात ठळक अशी होती. बाकीचे प्रतिनिधीच दिसून आले. मुळात एक बाब लक्षात घेतली पहिजे की, मतदान ही प्रक्रिया स्वच्छ असली पाहिजे. मत हे विकले जाऊ नये. मत हे मुल्यवान आहे. तो जरी कोणी खरेदी करीत असेल तर ते योग्य नाही. मतदान कोणाच्याही दबावाला बळी न पडता करा. आपलेल्या जे पटले त्यांनाच मतदान करा असा सल्ला देतात. जे छोट्याशा लालचेला बळी पडणाऱ्याचे काय? त्यांची संख्या मोठी दिसून येते. त्याना म्हणजे त्यांच्या प्रवृत्तीस रोखणे आवश्यक आहे. ज्यावेळी कागदावरील चिन्हाच्यापुढे फुलीचा शिक्का मारला जात होता त्यावेळी स्थिती कशी होती. त्याही वेळी ओरडच होती, यात सुधारणा होऊन अत्याधुनिक मशिनचा वापर केला जात आहे. डबल मतदान करणे, इतर व्यक्तीच्यानावे मतदान करणे अशा विविध प्रकाराबाबत ओरड होत होती. आता तर राज ठाकरे यांचे भाषणात म्हणतात जेव्हा केव्हा निवडणुका होतील, तेव्हा तुम्ही घरोघरी जा. मतदार याद्यांवर जोरदार काम करा. प्रत्येक मतदाराची ओळख पटवा. त्यानंतर मतदानाच्या ठिकाणी बसून मतदान करणारा तोच मतदार आहे का यावर लक्ष द्या. त्यात हे दुबार, तिबारवाले तिकडे आले तर त्यांना तिथेच फोडून काढा. बडव बडव बडवायचे आणि मग पोलिसांच्या ताब्यात द्यायचे. त्याशिवाय हे वठणीवर येणार नाहीत. त्याशिवाय या महाराष्ट्रात सुरू असलेला कारभार वठणीवर येणार नाही, असे राज ठाकरे म्हणाले. वास्तविक कोणी इतराच्या नावावर मतदान करीत असेल तर मतदान केंद्रात प्रत्येक उमेदवाराचा प्रतिनिधी उपस्थित असतो. सर्व प्रतिनिधीसमोर ओळख पटवुन मतदान कक्षात मतदानासाठी सोडले जाते असे असताना दुबार मतदान होत नाही. तसा प्रयत्न केला तर त्याला पोलिसांच्या ताब्यात दिले जाते. असे असताना विरोधकांची मागणी केली जात आहे तीची पडताळणी होणे अपेक्षित आहे. लोकशाहीवर विश्वास सर्वांचा आहे त्याला कोणत्याही परिस्थितीत तडा जाता कामा नये. त्यामुळे सत्याचा मोर्चा निघाला असला तरी त्यातील शंकेचे निरासण होणे अपेक्षित आहे. मुळात राज्यात विरोधकात एकी दिसून येत नाही. विरोधकाची स्थिती समाधानकारक दिसून येत नाही. त्यामुळे या प्रश्नाबाबत पक्षापेक्षा जनतेनी पेटून उठले पाहिजे. जनतेचा सत्याचा रेटा असेल तर मागणी यशस्वी होवु शकेल, नसता जे घडत आहे तेच जनतेला मान्य आहे असे समजले जाऊ शकते.

# जय हिंद ! जय भारताच्या मुलींनो!
# भारताच्या वाघिणींचे सुवर्णपान:

### एका आकांक्षेपासून विश्वविजयापर्यंत!
### तुम्ही मैदानावर इतिहास नाही भवीष्य लीहले






मैदानावरच्या त्या क्षणी वेळ थबकली होती. आपल्या धडधडत्या हृदयाचे ठोकेही जणू श्वास रोखून पाहत होते हरमनप्रीत कौरने जेव्हा तो अंतिम झेल हातात घट्ट पकडला! एक आवाज उमटला पहिले सौम्य मग गर्जना आणि मग ''भारत विश्वविजेता!'' होय भारताची मुलगी, भारताची विजेती झाली होती! नवी मुंबईतील डीवाय पाटील स्टेडियमवर भारतीय महिला संघाने दक्षिण आफ्रिकेचा ५२ धावांनी पराभव करून प्रथमच वर्ल्ड कपला गवसणी घातली आणि इतिहासाचे पान सुवर्ण अक्षरांनी चमकू लागले. भारतीय महिला संघाने इतिहास रचला, जो केवळ क्रीडा नव्हे, तर शक्ती, सामर्थ्य आणि स्त्रीत्वाला नवा अर्थ देणारा बदल होता.

हा विजय केवळ २०२५ चा नव्हता, तर २०१७ च्या जखमेवर लावलेला मायेचा मलम होता. एकदा जवळ येऊन निसटलेला तो विश्वचषक, मनातून खोलवर पुरलेला दुखरा काटा होता. त्याच स्मृतींनी आज विजयाचा दिवा पेटवला आणि ''अद्याप अपूर्ण आहे कथा'' असा धगधगता शपथेचा ज्वालामुखी शांत झाला.

हरमनच्या पकडो कॅच जितो मॅचने केवळ सामना नव्हे, तर भारताच्या नियतीची पकड मजबूत केली. हा विजय गाव–गल्लीपासून वर्ल्ड स्टेडियमपर्यंतचा प्रवास होता, जिथे खेळातली चूक कधी रडवून गेली, तर समाजाचा उपहास कधी जखमा देऊन गेला; पण त्या जखमेचा मलम जिद्द नावाचा होता!

केवळ प्रयत्नच नाही तर नियतीसुद्धा या भारतीय वाघिणींच्या बाजूने होती. कर्णधार हरमनने मिड ऑनला आणि स्मृतीने मिड ऑफला उभे राहून मध्यमगती गोलंदाज रेणुका ठाकूरला चिअर अप करत राहणे, अमनज्योतला एकाच झेलासाठी तीन संधी मिळणे, आणि शेवटी हरमनच्या हाती अखेरचा झेल स्थिरावणे, ही प्रयत्नांना नियतीची मिळालेली जोड होती.

हा विश्वविजय केवळ एक ट्रॉफी नव्हती, तर मुलींमध्ये वाढणाऱ्या खेळाची आवड आणि राष्ट्राच्या कीडा क्षेत्राची ती पावती होती. आज पहिल्यांदाच स्टेडियमची सीट्स नव्हे समाजाची मानसिकता भरून वाहत होती! हा प्रवास 'भारताची मुलगी' ते 'भारताची विजेती' शक्ती, सामर्थ्य, स्त्रीत्वाचा आहे. भारतीय वाघिणींच्या प्रत्येक धावेमध्ये त्यांच्या संघर्षाचे अक्षर होते, प्रत्येक विकेटमध्ये त्यांच्या अपमानाचा प्रतिउत्तर होता. त्यांनी दाखवून दिले की ''विजयाला लिंग नसते!''

२१ वर्षीय शेफाली वर्मा ही या विजयाची नायिका ठरली. संघाबाहेरून रिप्लेसमेंट म्हणून आलेली आणि अंतिम सामन्यात ८७ धावा आणि २ महत्त्वाच्या विकेट्स घेऊन सामनावीर पुरस्कार जिंकणारी ती पुरुषांच्या आणि महिलांच्या क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात तरुण खेळाडू ठरली. तिने केवळ चेंडू मारला नाही, तर समाजाच्या पुराणमतवादी दृष्टीला सीमारेषेबाहेर फेकले! दीप्ती शर्मा मालिकेत आणि अंतिम सामन्यात (५/३९) तिची अष्टपैलू कामगिरी, तसेच तिचा अखेरचा बळी नियती सुसंगत होता.

हा विजय व्यापक स्त्री–सक्षमीकरणाचे प्रतिक आहे. आज प्रत्येक आई म्हणाली ''ही माझी मुलगी आहे!'' आणि प्रत्येक बाबांचे डोळे म्हणाले ''मी तिसऱ्यांदा जन्म घेतला पहिल्यांदा तिला जन्म देताना, दुसऱ्यांदा ती खेळताना, आणि आज ती जिंकताना!'' हे यश दाखवून देते की, ''पोरी खेळतात'' ते आता ''पोरी जिंकतात'' यात बदलले आहे.

विजयातही प्रतिस्पर्ध्यांना मिठी देणारी हीच तर भारतीय संस्कृतीची सौम्यता! मॅरिझान कॅप पराभवानंतर रडत असताना, भारतीय खेळाडू जेमिमा रॉड्रिग्ज आणि राधा यादव यांनी तिला मिठी मारून धीर दिला. पराभवातही सन्मान दाखवणारी ही खिलाडूवृत्ती जगाला भावली, जी ट्रॉफी जिंकण्याहून अधिक महान आहे.

संघाच्या यशामागे कर्णधार हरमनप्रीत कौर आणि मुख्य प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांचे शांत, पण धगधगते नेतृत्व होते. हरमन डोळ्यात पाणी असूनही चेहऱ्यावर शांतता ठेवणारी हरमन, टीम इंडियाला शांतपणे फिनिशिंग लाईनपर्यंत घेऊन गेली. तिच्या नेतृत्वातील आग, आस्था आणि ''कप हाती नव्हे, मनात घेऊन खेळणे'' या तत्त्वाने इतिहास घडवला.

ज्या अमोल मुजुमदारला खेळाडू म्हणून कधीही आंतरराष्ट्रीय सामना खेळायला मिळाला नाही, त्याने आज 'आंतरराष्ट्रीय विजेता संघाचा सूत्रधार' म्हणून इतिहास रचला. विजयानंतर हरमनने जेव्हा भरल्या डोळ्यांनी अमोल मुजुमदारच्या पाया पडली, ती हजार वेळा प्रेम करावे अशी फ्रेम होती! त्याचा शांत नेतृत्व, मानसिक मजबुती आणि अचूक रणनीती हेच या यशाचे गमक आहे. ''छायेतील सूर्य'' असलेल्या या प्रशिक्षकाने, कधी न खेळलेल्या खेळाडूने विजेते घडवले.

या ऐतिहासिक विजयामुळे भारतीय महिला क्रिकेटला आर्थिक समानता आणि सन्मानाचा नवा अध्याय मिळाला आहे. टीम इंडियाने विश्वचषक जिंकून क्ष्क्क् कडून ॐ४.४८ दशलक्ष (सुमारे ४० कोटी रुपये) इतकी विक्रमी बक्षीस रक्कम जिंकली आहे. पुरुष किंवा महिला क्रिकेटच्या इतिहासातील ही सर्वात मोठी बक्षीस रक्कम आहे, जी समानतेच्या दिशेने टाकलेले मोठे पाऊल आहे. तसेच, एक्क्क्ष् ने पुरुषांच्या टी–२० विश्वचषक विजेत्या संघाला दिलेल्या १२५ कोटी रुपयांइतकीच बक्षीस रक्कम महिला संघासाठी जाहीर केली आहे, ज्यामुळे महिला क्रिकेटला अभूतपूर्व पाठिंबा मिळाला आहे.

यानिमीत्ताने असे म्हणावे लागेल महिला प्रीमियर लीग (ज़्घ्ख्र्) सारख्या स्पर्धांमुळेच खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या दबावात खेळण्याचा अनुभव मिळाला, ज्यामुळे त्यांना विश्वचषकासारख्या मोठ्या स्तरावर कामगिरी करणे शक्य झाले.

या विजयामुळे ''विश्वकप'' नव्हे, तर ''महीला विश्व कप'' या शब्दाला जगात नवी ओळख मिळाली आहे. हा विजय हे भारतीय महिला क्रिकेटमधील नव्या युगाची सुरुवात आहे. देशभरातील प्रेक्षकांचे धडधडणारे हृदय, हजारो मोबाईल–टीव्हीसमोर गोठलेली नजर, आणि शेवटी गर्जनाऱ्या आवाजात एकच घोषणा जय हिंद ! जय भारताच्या मुलींनो!

हा विजय भारतीय महिला क्रिकेटचा नाही, तो प्रत्येक भारतीयाच्या आत्मविश्वासाचा, प्रत्येक मुलीच्या स्वप्नांचा आणि एका नव्या भारताच्या भविष्याचा पाया आहे. या विजयाच्या ट्रॉफीला धूळ बसू शकेल, पण या दिवसाच्या अभिमानाला कधीच नाही! या मुलींनी दाखवून गेल्या ''उड्डाणाला पंखांपेक्षा उत्साहाची गरज असते.'' त्यांनी इतिहास नाही, भविष्य लिहिले आहे!

**–राहुल हरिभाऊ इंगळे पाटील**
**मो. ९८९०५७७१२८**





## मोबाईल स्क्रीनवर जाहिरातींचा महापूर, या छोट्या सेटिंगमुळे सोपे होईल काम

फोन वापरताना काही समस्या उद्भवतात, ज्यामुळे फोन वापरण्याचा अनुभव खराब होतो. या समस्यांमध्ये नेटवर्क समस्या आणि जाहिरातींचा वारंवार घटना समाविष्ट आहे. कामाच्या मध्येच जाहिरात आल्याने अनेक वेळा चिडचिड होते, अशा स्थितीत अनेकांना त्रास होऊन चिडचिड होते. पण तुमच्यासोबत असे होऊ नये म्हणून आम्ही तुम्हाला या समस्येपासून मुक्त कसे होऊ शकता ते सांगणार आहोत.

अशा प्रकारे जाहिराती होतील ब्लॉक

यासाठी सर्वात आधी तुमच्या फोनच्या सेटिंग्जमध्ये जा, त्यानंतर सर्च बारमध्ये 'झीळींरींश ऊछड' लिहून सर्च करा.

यानंतर प्रायव्हेट डीएनएसवर क्लिक करा आणि प्रायव्हेट डीएनएस प्रोव्हायडर होस्टनेमच्या पर्यायावर क्लिक करा.

याच्या खाली तुम्हाला एक रिकामी जागा मिळेल ज्याम ध्ये तुम्हाला ऻिळींरींशवपीरवर्सीरीव.लो लिहायचे आहे.

यानंतर ही कमांड सेव्ह करा. हे केल्यानंतर तुम्हाला जाहिराती दिसणे बंद होईल.

तुमच्या फोनमध्ये कमी थर्ड पार्टी ॲप्स वापरण्याचा कमी प्रयत्न करा. बऱ्याच वेळा, थर्ड–पार्टी ॲप्समुळे, अधिक जाहिराती येतात.

हा उपाय जाहिरातीपासून मुक्त होण्यास करेल मदत

जर वर नमूद केलेल्या पद्धतीमुळे जाहिरातींचा हल्ला थांबत नसेल, तर तुम्ही तुमच्या फोनमध्येही ही सेटिंग करू शकता. यासाठी सर्वप्रथम तुमच्या फोनच्या सेटिंग्जमध्ये जाऊन गुगलवर क्लिक करा. यानंतर 'मॅनेज युअर गुगल अकाउंट' या ऑप्शनवर क्लिक करा.

येथे 'डेटा आणि गोपनीयता' या पर्यायावर क्लिक करा. यानंतर 'पर्सनलाइज्ड अ्स' वर जा. तुमच्या कोणत्या क्रियाकलापांचा मागोवा घेतला जात आहे, ते येथे तुम्ही पाहू शकता. ज्यामुळे तुम्हाला जाहिराती दाखवल्या जातात. गुगल तुम्हाला तुमच्या आवडीनुसार आणि शोधानुसार जाहिराती दाखवते.

'पर्सनलाइज्ड ॲ्स' नंतर 'माय सेंटर' या पर्यायावर क्लिक करा. येथे 'झर्शीपरश्र्ळूशव अवी' चा पर्याय दिसेल, तो बंद करा. हे केल्यानंतर, फोनच्या सेटिंग्जमध्ये पुन्हा जा आणि उद्दुत वर क्लिक करा आणि 'अर्वीशीींळीळपस खऊ हटवा' वर क्लिक करून तो हटवा.

या सेटिंग्ज केल्यानंतर, तुम्हाला फोनवर जाहिराती दिसणे बंद होईल. तुम्ही आनंदाने आणि कोणत्याही व्यत्ययाशिवाय काहीही करण्यास सक्षम व्हाल.

## वाढत्या उष्णतेपासून लहान मुलांचे संरक्षण कसे कराल या टिप्स फॉलो करा अन् तुमच्या मुलांची उन्हाळा सुट्टी आनंददायी बनवा



उन्हाळ्यात शरीरातील पाणी कमी झाल्यामुळे उष्माघाताची सर्वाधिक जोखीम अधिक असते. अतिसार, लघवीला जळजळ होणं, उलटी तसेच डोकेदुखीसारखे त्रास होतात. लहान मुलं शारीरिकदृष्ट्या खूप नाजूक असतात. त्यामुळे उन्हाळ्यातील कडक ऊन आणि प्राणघातक उष्णतेचा परिणाम मुलांच्या आरोग्यावर तसेच त्यांच्या नाजूक त्वचेवर होतो. वातावरणातील बदल व हवेतील आर्द्रता यामुळे मुलांमध्ये विषाणूंचे संक्रमण होऊन खोकला व सर्दीसारखे विकार होत असतात. मुलांची त्वचा नाजूक असते. तेव्हा त्यावर प्रखर सूर्यकिरणांचा परिणाम होऊन त्वचा पोळली जाते व काळी पडण्याची शक्यता असते.

उघड्या अन्नावरील विषाणू व विषाणूयुक्त पाणी यातून आजार जडतो. तसेच दूषित बर्फामधून याचा फैलाव होत असतो. मुलांच्या बाबतीत पालकांनी काळजी घेणे गरजेचे आहे. उलट्या किंवा तापाची लक्षणे दिसताच तत्काळ डॉक्टरांना दाखवणे गरजेचे आहे. मुलांची विशेष काळजी घेण्यासाठी काही महत्त्वाच्या टिप्स जाणून घेऊया. मदरहूड हॉस्पिटल येथील सल्लागार बालरोगतज्ञ डॉ. प्रशांत मोरलवार यांनी वाढत्या उष्णतेपासून लहान मुलांचे संरक्षण कसे करायचे याबद्दल माहिती दिली आहे.

वाढत्या उष्णतेपासून लहान मुलांचे संरक्षण कसे कराल

– मुलांना दिवसभर पाणी पिण्यास प्रोत्साहन द्या जेणेकरुन ते हायड्रेटेड राहतील विशेषत: मैदानी खेळादरम्यान त्यांना पुरेसे पाणी द्या. दररोज किमान १०–१२ ग्लास पाणी प्या.

– घराबाहेर पडताना भरपूर पाणी प्या आणि साखरयुक्त पेयांचे सेवन टाळा ज्यामुळे जलद निर्जलीकरण होते.

– थकवा, डोकेदुखी, स्नायूंमधील वेदना आणि चक्कर येणे यासारख्या निर्जलीकरणाच्या लक्षणांकडे लक्ष द्या.

– अत्यावश्यक जीवनसत्त्वे आणि खनिजे प्रदान करण्यासाठी फळे, भाज्या आणि तृणधान्यांनी समृद्ध आहाराचे सेवन करा.

– शर्करायुक्त पदार्थ आणि प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थांचे सेवन मर्यादित करा. यातुन कमी पौषणमूल्य आणि ऊर्जा पातळीवर परिणाम होऊ शकतात.

– फळे, सुकामेवा किंवा दही यांसारखे निरोगी पदार्थांचे सेवन करा.

उष्णतेपासून बचाव कसा कराल

– घराबाहेर जाण्यापूर्वी कमीतकमी १५ मिनिटे आधी तुम च्या मुलांच्या उघड्या त्वचेवर एझ्झ ३० किंवा त्याहून अधिक सनस्क्रीन लावा.

– दर दोन तासांनी किंवा जास्त वेळा पोहल्यानंतर किंवा घाम आल्यावर पुन्हा सनस्क्रीन लावा.

– टोपी, सनग्लासेस आणि सैलसर सुती कपडे यासारखे कपडे घाला.

पाण्यात खेळताना घ्यायची सुरक्षा –

– आपल्या मुलाला पाण्याच्या जवळ कधीही लक्ष न देता सोडू नका, अगदी काही क्षणासाठी देखील.

– तुमच्या मुल पोहताना त्याच्यास आजूबाजूस एखादी प्रौढ व्यक्ती असेल याची काळजी घ्या.

– मुलांना पाण्याची सुरक्षेची मूलभूत कौशल्ये शिकवा जसे की तरंगणे आणि पोहण्याचे तंत्र शिकवा.

या उन्हाळ्यात सुरक्षा टिप्सचे पालन करून, तुम्ही तुमच्या मुलासाठी उन्हाळा आनंददायी बनवू शकता.

# काळे मनुके की पिवळे मनुके कोणते मनुके खाल्ल्यानं जास्त फायदे



मनुके खाणं तब्येतीसाठी उत्तम मानलं जातं. खासकरून लोक रात्रभर भिजवलेले मनुके खातात. मनुके खाण्याचे बरेच फायदे आहेत. मनुक्यांमध्येही प्रकार असतात. पिवळे मनुके, काळे मनुके. अधिकाधिक लोक या दोन्ही मनुक्यांमधील फरकाबाबत गोंधळलेले असतात. लोकांच्या मनात प्रश्न असतात की कोणते मनुके तब्येतीसाठी उत्तम ठरतात. अलिकडेच न्युट्रिशनिस्ट दीपशिखा जैन यांनी आपल्या इंस्टाग्राम हॅण्डलवरून एक व्हिडिओ शेअर केला आहे. यात त्यांनी याबाबत अधिक माहिती दिली आहे.

**एक्सपर्ट्स काय सांगतात**

पिवळे किंवा गोल्डन मनुके सल्फर डायऑक्साईडयुक्त असतात. म्हणून त्याचा रंग हलका पिवळा असतो. न्युट्रिशनिस्ट दीपाशिखा जैन यांच्यामते हे थायरॉईडच्या रुग्णांसाठी अधिक फायदेशीर ठरते. म्हणून रिकाम्या पोटी खाल्ल्यास बरेच फायदे मिळतात. ज्यामुळे थायरॉईड लेव्हल संतुलित राहण्यासही मदत होते.

**काळे मनुके खाण्याचे फायदे**

काळे मनुके आयर्नचा एक उत्तम स्त्रोत आहेत. जर कोणाच्याही शरीरात रक्ताची कमतरता असेल तर रोज ६ ते ७ काळे मनुके पाण्यात भिजवून खायला हवेत. ज्यामुळे हिमोग्लोबीनचा स्तर वाढतो आणि कमकुवतपणा दूर होतो.

**वजन कमी करण्यासाठी उत्तम**

जर तुम्ही फिटनेस किंवा वजन कमी करण्याच्या प्रयत्नात असाल तर दोन्ही प्रकारचे मनुके आपल्या आहारात ठेवा. हे नॅच्युरल स्विटनरप्रमाणे काम करते ज्यामुळे शुगर क्रेव्हिंग्स कमी होतात.

त्वचेसाठी फायदेशीर ठरते. हे त्वचेसाठी एक उत्तम एंटी एजिंग फूड आहे. कारण यातील एंटी ऑक्सिडेंट्स सुरकुत्या कमी करतात आणि त्वचा हेल्दी ठेवून त्वचेवरील ग्लो टिकवून ठेवतात.

काळ्या मनुक्यांमध्ये एंटी ऑक्सिडेंट्सचे प्रमाण जास्त असते. काळे मनुके खाणं तब्येतीसाठी उत्तम ठरतं. ज्यामुळे शरीरातील टॉक्सिन्स बाहेर निघण्यास मदत होते. त्वचा ग्लोईंग बनते. रोज ६ ते ८ मनुके खाणं तब्येतीसाठी उत्तम ठरतं.

# दालचिनीची चिमूटभर पावडर झरझर उतरवेल वजन!

ज्यांना सतत गोड खावं वाटतं त्यांनी दालचिनीचे वरील उपाय करून पाहावे. शुगर क्रेव्हिंगही कमी होते.

आपल्या स्वयंपाक घरात कित्येक प्रकारचे मसाले असतात. हे मसाले पदार्थाची चव खुलविण्यासाठी उपयुक्त ठरतात हे तर आपल्याला माहितीच आहे. पण त्या प्रत्येक मसाल्यातून शरीराला कोणते ना कोणते पौष्टिक घटक हमखास मिळत असतात. त्यामुळे आपल्या रोजच्या स्वयंपाकातही मसाल्यांचा थोडासा वापर रोजच करायला हवा. त्यापैकीच एक सुगंधी पदार्थ म्हणजे दालचिनी. सूप, पंजाबी भाज्या किंवा चहामध्ये आपण दालचिनी घालतो (शळसहीी श्रीी ींळ्ीी). पण तिचा शरीराला खऱ्या अर्थाने लाभ होण्यासाठी ती कोणत्या पद्धतीने खायला हवी ते पाहूया.

दालचिनीचे शरीराला होणारे फायदे

१. दालचिनीमध्ये असणारे काही घटक चयापचय क्रिया आणखी चांगली करतात. त्यामुळे शरीरावर चरबी साचून राहात नाही. म्हणूनच वेटलॉस करण्यासाठी दालचिनी नियमितपणे खायला हवी. यासाठी सकाळी कोमट पाण्यात दालचिनीची पावडर घालून तुम्ही ते रिकाम्या पोटी पिऊ शकता.

पांढरे केस काळे होतीलच, पण डोक्यांतला कोंडाही कमी होईल- घ्या कमालीचा २ ळप १ उपाय...

२. एक कप पाण्यात दालचिनीचा एक छोटासा तुकडा घाला आणि ते पाणी काही मिनिटे चांगलं उकळवून घ्या. नंतर ते पाणी गाळून घ्या आणि कोमट असतानाच प्या. जेवणानंतर किंवा रात्री झोपण्यापुर्वी तुम्ही अशा पद्धतीचा दालचिनीचा काढा घेऊ शकता. यामुळे पचनक्रिया चांगली होते. यामुळे झोप चांगली येते. झोप चांगली येण्यासाठी तुम्ही कपभर गरम दुधात दालचिनीची पावडर घालूनही ते पिऊ शकता. ३. दालचिनीची पावडर चहा, सूप, भाज्या, आमटी अशा वेगवेगळ्या पदार्थांच्या माध्यमातून घेत असाल तर ते ही चांगलेच आहे. कारण त्यामुळे पचनक्रिया अधिक चांगली होते.

महिलांचं वजन वाढवतात 'या' २ गोष्टी, वजन वाढत असेल तर १०० % तुम्ही 'हेच' करताय..

शिवाय शुगर क्रेव्हिंगही कमी होते. त्यामुळे ज्यांना सतत गोड खावं वाटतं त्यांनी दालचिनीचे वरील उपाय करून पाहावे. पण दालचिनीचे एवढे सगळे फायदे असले तरीही तिचा अतिरेक टाळायला हवा. १ टीस्पून दालचिनी एका दिवसाला पुरेशी आहे,

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, उदगीर**
**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उदगीर**
**बांधकाम भवन, उदगीर-नळेगाव रोड उदगीर जि. लातुर**

E-mail : udgir.ee@mahapwd.gov.in
Visit Us: WWW.mahapwd.gov.in

**ई-निविदा ब-१/सूचना क्रमांक युडीआर/क्र.११/सन २०२५-२६ (ऑनलाईन)**
**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उदगीर.**

ब-१ नमुन्यातील निविदा. ई-निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन मागविण्यात येत आहेत. ई-निविदे बाबत संपूर्ण माहिती खालील वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**अटी :**

१) खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे
http://mahapwd.gov.in, http://mahatenders.gov.in

(सदरनिविदेमध्ये काही बदल होत असल्यास वरिल वेबसाईटवरती कळविण्यात येईल)

२) एक कोटी पन्नास लक्ष खालील किंमतीची निविदा डाऊनलोड विक्री (बिड सबमिशन) कालावधी आठ दिवस राहील.

@ कोणत्याही किंवा सर्व कामाच्या निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे.

स्वाक्षरित/-
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, उदगीर**

आरओसी-२०२५-२६/क्र.-५/सी३७२५







**कृषि उत्पन्न बाजार समिती, लातूर.**
शेतमाल आवक व दर अहवाल
अहवाल दि. ०३/११/२०२५

| अ.क्र | शेतीमालाचे नांव | आवक क्विंटल | घावूक भाव प्रति क्विंटल | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | कमाल | किमान | सर्वसाधारण |
| १ | गहू | १७३ | ३२०० | २६०० | ३००० |
| २ | ज्वारी हायब्रिड | ७६ | २४७५ | २२०० | २३६० |
| ३ | ज्वारी रब्बी | २१८ | ३२५० | २८५० | ३१०० |
| ४ | ज्वारी पिवळी | ३३ | ३५०० | ३००० | ३४०० |
| ५ | बाजरी | २१ | २६०० | २४०० | २५०० |
| ६ | हरभरा | ४२९ | ५७४० | ४२९० | ५५०० |
| ७ | तुर | ७६३ | ७२६० | ६६९० | ७१०० |
| ८ | मुग | ४४७ | ८००० | ४००० | ७२०० |
| ९ | उडीद | २११३ | ६००० | ३६११ | ५४०० |
| १० | करडई | ६ | ८४०० | ७००० | ८३०० |
| ११ | सोयाबीन | ११४१० | ४७०१ | ३९११ | ४५५० |










## पौष्टिक खा, फिट राहा! डॉक्टर टीप्स



नव्या वर्षात तुम्ही फिटनेसच्या दृष्टीनं काही संकल्प करत असाल तर त्याची सुरुवात आता-पासून करणं गरजेचं आहे. सध्याचा काळात अत्याधुनिक जिम आणि उत्तम व अनुभवी व्यायाम प्रशिक्षक या सर्वांमुळे कठीण वाटणारा व्यायाम आता सोपा वाटू ला-गला आहे. तसंच काळाची गरज जाणून अनेकांती पावलं जिमच्या दिशेनं वळू लागली आहेत. तुमच्या संकल्पाच्या दृष्टीनं फायदेशीर ठरतील अशा व्यायामाच्या प्रकारांविषयी आजच्या लेखातून जाणून घेऊ या...

स्पिनिंग

या व्यायाम प्रकारात सायकल चालवण्यास प्राधान्य दिलं जातं. हे हृदय आणि फुफ्फुसासाठी फायदेशीर असतं. तुमच्या पायांच्या स्नायूंना देखील बळकटी मिळते. सायकलींमध्ये येणाऱ्या नवनव्या तंत्रज्ञानामुळे लोकांची सायकल चालवण्यात रुची वाढली आहे. सोबतच व्यायाम करण्यासाठी इतर पर्यायांसोबतच सायकलचा वापर देखील वाढत चालला आहे.

(**क्रमशः**)




## विनोद

राधा : काय गं राणी, तुझ्या नवऱ्याला तुरुंगात का जावे लागले ?
राणी : काय नाही गं, यांनी नोटा छापायची सरकारशी स्पर्धा केली म्हणून.

## संदेश

Tourist = Ye kiska kankaal hai..?
Santa = Ye tipu-sultaan ka kankaal hai..
Tourist = Or ye bagal wala chhota sa kankaal kiska hai..?
Santa = Ye bhi tipu-sultaan ka kankaal hai.. jab wo chhota bachcha tha....

## सुविचार




शब्दांपेक्षा मौनच जास्त बोलके असते.
- कार्लाइल

**संस्कृत सुभाषित**

आयु: सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धना:।
रस्या: ास्निग्धा: ास्थिरा हृद्या आहारा: सात्विकप्रिया : ।।

अर्थ - जो आहार आयुष्य, मनोबल, शक्ती, प्रेम, सुख यांचे संवर्धन करतो, तोच आहार सात्विक लोकांना प्रिय असतो.(हा स्निग्ध आणि रसमय आहार असतो.)

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रसवान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत




## थोडक्यात/ संक्षिप्त

### तुम्हाला चिअर करण्यासाठी सचिन, रोहित आला, आमचे क्रिकेटर कुठे आहेत? दक्षिण आफ्रिकन अभिनेत्री भडकली

दिल्ली,-दक्षिण आफ्रिकेतील अभिनेत्री आणि लेखिका थान्या वूरने व्हिडिओ शेअर करत दक्षिण आफ्रिकन क्रिकेटपटूंवर संताप व्यक्त करतानाच भारताच्या क्रिकेटवरील प्रेमाचे कौतुक केलं आहे. थान्याने क्रिकेट विश्वचषकाबद्दल दक्षिण आफ्रिकेतील महिलांच्या उदासीनतेबद्दल निराशा व्यक्त केली. भारतीय महिला क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकल्यानंतर, तिने ऐतिहासिक विजयाचे कौतुक करणारा आणि स्वत:च्या संघावर टीका करणारा एक व्हिडिओ प्रसिद्ध केला. भारतीय संघाचे कौतुक करताना थान्या म्हणाली, मफ्तुमचा विजय अपरिहार्य होता आणि तुम्ही त्याला पात्र होता. कारण तुम्ही वर्चस्व गाजवत होता, तुमच्या पुरुष संघाचे क्रिकेटपटू तुम्हाला पाठिंबा देण्यासाठी तिथे होते, परंतु आमच्या बाजूने कोणीही नव्हते.फ्फ थान्या वूरने इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केला.

***

### महिला वर्ल्डकपसह आयसीसीची प्रत्येक ट्रॉफी भारताच्या नावावर; सर्वाधिक जेतेपदांच्या यादीत दुसऱ्या स्थानी

दिल्ली-हरमनप्रीत कौरच्या फौजेने रविवारी वूमन्स वर्ल्डकप स्पर्धेच्या जेतेपदावर नाव कोरत इतिहास घडवला. या जेतेपदासह आयसीसीतर्फे आयोजित सर्व स्पर्धांची जेतेपदं पटकावण्याचा विक्रम भारताच्या नावावर नोंदला गेला आहे. सर्वाधिक आयसीसी जेतेपदं पटकावणाऱ्या संघांच्या यादीत भारत आता दुसऱ्या स्थानी आहे.या यादीत ऑस्ट्रेलियाचा संघ अव्वल स्थानी आहे. ऑस्ट्रेलियाच्या पुरुष संघाने (१०), महिलांनी (१३), ळ१९ मुलं (४) अशी एकूण २७ जेतेपदं पटकावली आहेत.भारत आता १५ जेतेपदांसह दुसऱ्या स्थानी आहे. भारताच्या पुरुष संघाने ७ स्पर्धांची जेतेपदं पटकावली आहेत. यामध्ये कपिल देव यांच्या नेतृत्वात पटकावलेला १९८३चा वर्ल्डकप, महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वात जिंकलेला २०११च्या वर्ल्डकपचा समावेश आहे.

***

### कोच अमोल मुझुमदार यांचे रोहित शर्मासारखे आयकॉनिक सेलिब्रेशन, मुंबईच्या मैदानावर रोवला भारताचा तिरंगा

दिल्ली-महिला एकदिवसीय विश्वचषक २०२५ च्या ट्रॉफीवर भारतीय संघाने आपलं नाव कोरलं. टीम इंडियाने स्पर्धेच्या अंतिम फेरीत दक्षिण आफ्रिका महिला संघाचा ५२ धावांनी पराभव करत ट्रॉफीची प्रतिक्षा संपवली. शफाली वर्मा व दीप्ती शर्मा यांची अष्टपैलू कामगिरी सामन्यात महत्त्वपूर्ण ठरली. दरम्यान विजयानंतर महिला संघाचे कोच अमोल मुझुमदार यांनी रोहित शर्माचे टी-२० विश्वचषक विजयानंतरचे आयकॉनिक सेलिब्रेशन पुन्हा केले.
रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखाली भारतीय महिला संघाने टी-२० विश्वचषक २०२४ चं जेतेपद पटकावलं. बार्बोडोसच्या मैदानावर झालेल्या या सामन्यात टीम इंडियाने विजय मिळवल्यानंतर रोहित शर्मानं त्या मैदानावर भारताचा तिरंगा रोवला होता.

**

### काश्मीरमध्ये बोलावणाऱ्या आयोजकांचा हॉटेलचे बिलही न भरता पोबारा

जम्मू-जम्मू काश्मीरात आयोजित एका खाजगी लीगसाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटूंना बोलावण्यात आले. मात्र प्रत्यक्षात भलतंच चित्र समोर आलं आहे. हॉटेलचं बिलही न भरता लीगच्या आयोजकांनी पोबारा केल्याचं स्पष्ट झालं आहे. आयोजक गायब झाल्याने खेळाडू, अंपायर्स, सामनाधिकारी यांना नेमकं कुणाला गाठायचं असा प्रश्न पडला आहे. द इंडियन हेवन्स प्रीमिअर लीगचे आयोजन काश्मीरात करण्यात आलं आहे. यामध्ये ८ संघ आहेत. संघांमध्ये ख्रिस गेल. थिसारा परेरा, जेसी रायडर,डेव्हेन स्मिथ यासार मोठ्या आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा समावेश आहे. २५ ऑक्टोबर सुरू झालेली ही स्पर्धा ८ नोव्हेंबरला संपणार आहे.

# कपिल देव आणि धोनीनंतर हरमनप्रीत कौरने रचला इतिहास

**भारताने ५० षटकांत ७ गडी गमावून २९८ धावा** | **दक्षिण आफ्रिका ४५.३ षटकांत २४६ धावांवर ऑलआउट**

**नवी मुंबई :** भारतीय महिला क्रिकेट संघाने २०२५ च्या आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेचा पराभव करून देशाला तिसऱ्यांदा एकदिवसीय विश्वचषक जिंकून दिला. यापूर्वी, भारतीय पुरुष क्रिकेट संघाने भारतासाठी दोन एकदिवसीय विश्वचषक जिंकले आहेत. कपिल देव यांनी १९८३ मध्ये भारताला पहिला एकदिवसीय विश्वचषक जिंकून दिला. त्यानंतर महेंद्रसिंग धोनीने भारताला दुसऱ्या एकदिवसीय विश्वचषक ट्रॉफी जिंकून दिली. आता, हरमनप्रीतनेही इतिहासात आपले नाव कोरले आहे.

महिला एकदिवसीय विश्वचषक २०२५ चा अंतिम सामना २ नोव्हेंबर रोजी नवी मुंबईतील डी.वाय. पाटील स्टेडियमवर भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात खेळला गेला. प्रथम फलंदाजी करताना भारताने ५० षटकांत ७ गडी गमावून २९८ धावा केल्या. २९९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिका ४५.३ षटकांत २४६ धावांवर ऑलआउट झाली आणि भारतीय महिला क्रिकेट संघाने ५२ धावांनी सामना जिंकून विश्वचषक जिंकला.

महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वाखाली भारताने २ एप्रिल २०११ रोजी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर श्रीलंकेविरुद्ध एकदिवसीय



विश्वचषकाचा अंतिम सामना खेळला. २७५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताने श्रीलंकेचा ६ विकेट्सने पराभव केला. या सामन्यात धोनीने भारतासाठी विजयी षटकार मारला. भारतासाठी धोनीने ७९ चेंडूत ९१ धावा केल्या. गौतम गंभीरने ९७ धावा केल्या. श्रीलंकेसाठी महेला जयवर्धनेने १०३ धावा केल्या होत्या. दरम्यान, भारताने २८ वर्षांनंतर दुसऱ्यांदा एकदिवसीय विश्वचषक जिंकला होता.


पिल देव यांनी त्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय क्रिकेटचा सुवर्ण इतिहास लिहिण्यास सुरुवात केली. १९८३ च्या एकदिवसीय विश्वचषकात भारतीय संघा विश्वचषक उंचावेल याची कल्पनाही कुणी केली नव्हती. पण कपिल देव यांच्या संघाने अंतिम सामन्यात वेस्ट इंडिजचा पराभव करून भारताला पहिले एकदिवसीय विश्वचषक विजेतेपद मिळवून दिले होते. त्यावेळी वेस्ट इंडिजचा पराभव करणे अशक्य मानले जात होते. पण भारताने ट्रॉफी जिंकून इतिहास रचला होता.

६० षटकांच्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारतीय क्रिकेट संघ ५४.४ षटकात १८३ धावांवर ऑलआउट झाला. भारताकडून कृष्णमाचारी श्रीकांतने सर्वाधिक ३८ धावा केल्या. १८४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, वेस्ट इंडिजचा संघ भारतीय गोलंदाजांसमोर ५२ षटकांत १४० धावांतच गारद झाला आणि भारताचा ४३ धावांनी विजय निश्चित झाला आणि पहिल्यांदाच विश्वचषक जिंकला. मदन लाल आणि मोहिंदर अमरनाथ यांनी प्रत्येकी तीन, तर कपिल देव आणि रॉजर बिन्नी यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली होती.

हरमनप्रीत कौरने भारतासाठी पहिली-वहिली महिला विश्वचषक ट्रॉफी उंचावत कपिल देव आणि महेंद्रसिंग धोनीच्या पंक्ती स्थान मिळवले आहे. आतापर्यंत भारतासाठी या तीन कर्णधारांनी विश्वचषकचे विजेतेपद पटकावले आहे. हरमनप्रीत कौरच्या या टीमने मिळवलेल्या सोनेरी यशाने भारतीय महिला क्रिकेटला एक नवी उमेद मिळणार आहे. ज्याप्रमाणे १९८३चा विश्वचषक भारताने जिंकल्यानंतर भारतीय पुरुष क्रिकेटचा चेहरा बदलला होता. त्याचप्रमाणे महिलांच्या या देदिप्यमान कामगिरीमुळे निश्चितच भारतीय महिला क्रिकेट एक नवी उंची गाठेल यात शंकाच नाही.

## आम्हीच जिंकलो असतो, पण तिथे सर्व बिघडलं

**द आफ्रिकेच्या कर्णधाराने भारताच्या या खेळाडूला ठरवलं पराभवास जबाबदार**





**नवी मुंबई :** वर्ल्ड कप फायनल सामन्यामध्ये दक्षिण आफ्रिका संघाचा पराभव करत भारतीय महिला संघाने ५२ धावांनी विजय मिळवला. आफ्रिका संघाच कर्णधार लॉरा वोल्वाड्र्टने १०१ धावांची झुंजार शतकी खेळी केली. मात्र संघाला विजय मिळवून देण्यात यशस्वी ठरली नाही. नेमका सामना कुठे फिरला जाणून घ्या.
डर्रीर थेर्श्रींररीवीं
(फोटो- महाराष्ट्र टाइम्स.कॉम)
मुंबई : महिला विश्वचषक अंतिम सामन्यात भारताकडून दक्षिण आफ्रिकेचा संघ ५२ धावांनी पराभूत झाला. या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करताना २९८ धावा केल्या होत्या. या आव्हानाचा पाठलाग करताना आफ्रिकेचा संघ २४६ धावांवर ऑल आऊट झाला. आफ्रिका संघाची कॅप्टन लॉरा वोल्वाड्र्टने १०१ धावांची झुंजार शतकी खेळी केली. मात्र संघाला विजय मिळवून देण्यात अपयशी ठरली. ४० व्या ओव्हरपर्यंत सामना दोन्ही बाजून झुकता होता, मात्र त्यानंतर भारतीय गोलंदाजांनी मुसंडी मारली. सामना झाल्यावर कर्णधार लॉरा वोल्वाड्र्ट हिने सामना कुठे गमावला हे सांगितलं.
आम्ही खूप वेळ सामन्यात होतो, बरोबरीत सामना सुरू होता. माझी आणि (एनेरी) डर्कसनची भागीदारी चांगली झाली होती. मला वाटले होते की आम्ही हा सामना शेवटपर्यंत घेऊन जाऊ. मग जेव्हा आम्ही शेवटच्या १० षटके बाकी होतीत तेव्हा ती आऊट झाली आणि मग मीही आऊट झाली. क्लो (ट्रायोन) आणि नाडेस (नादिन डि क्लार्क) आम्हाला विजय मिळवून देऊ शकतात, पण शेवटी असे वाटले की आम्ही डि क्लार्कसाठी खूप जास्त धावा बाकी राहिल्या, असं लॉरा वोल्वाड्र्ट म्हणाली. एकंदरित आफ्रिका संघाचीही सामन्यावर पकड होती पण पाच विकेट घेणाऱ्या दीप्तीने डर्कसन, लॉरा वोल्वाड्र्ट आणि नादिन डि क्लार्क यांच्या विकेट घेत सामन्याला कलाटणी दिली.
'माझं मन मला सांगत होतं, की...'; मॅचचा टर्निंग पॉईंट ठरलेल्या शेफालीच्या बॉलिंगवर हरमनप्रीतचा खुलासा
या स्पर्धेत माझ्या एकदिवसीय क्रिकेटमध्ये बरीच प्रगती झाली आहे. सामना जिंकण्यासाठी तुम्हाला सकारात्मक आणि आक्रमक असणे आवश्यक आहे आणि मी या स्पर्धेत ते थोडेफार आजमावण्याचा प्रयत्न केला आहे. यानंतरही मला वाटते की एकदिवसीय क्रिकेटमध्ये हे माझे सर्वोत्तम वर्ष नव्हते, असंही वोल्वाड्र्टने म्हटलं आहे.
भारतीय महिलांनी वर्ल्ड कप जिंकला; आता पुन्हा मुंबईत विक्ट्री परेड होणार? बीसीसीआयकडून मोठी अपडेट
दक्षिण आफ्रिकेची कर्णधार वोल्वाड्र्टने सेमी फायनलमध्ये १६९ धावांची ऐतिहासिक खेळी केल्यानंतर भारताच्या विरोधात फायनल सामन्यात १०१ धावांची झुंजार खेळी केली. जर सामन्यात शेवटपर्यंत टिकली असता तर कदाचित सामन्याचा निकाल ती पालटवू शकली असती. दक्षिण आफ्रिकेचा संघ २०२३ आणि २०२४ मध्ये टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेचा उपविजेता ठरला होता. आता वन डे वर्ल्ड कपच्या अंतिम फेरीत भारताकडून पराभव पत्करावा लागला.

**याला म्हणतात टीम इंडिया...**

## व्हिलचेअरवर खेळाडूला तिरंगा घेऊन आणलं मैदानात

नवी मुंबई : भारतीय संघाचं टीम स्पिरिट एवढं भन्नाट आहे की, ते कोणत्याही खेळाडूला कधीच विसरत नाहीत. भारताच्या एका खेळाडूला वर्ल्ड कप खेळत असताना दुखापत झाली. ही दुखापत एवढी गंभीर होती की, तिला चालताही येत नव्हतं. पण भारतीय खेळाडू तिला विसरले नाहीत. भारताने वर्ल्ड कप जिंकला. सर्वांनी सेलिब्रेशन केलं. पण या आनंदात मश्गुल असताना ते आपल्या या जखमी खेळाडूला विसरले नाहीत. व्हिलचेअरवरून या खेळाडूला तिरंगा घेऊन मैदानात आणलं आणि सर्वांचेच डोळे पाणावले. भारतीय खेळाडूंचा हा व्हिडिओ आता जोरदार व्हायरल होत आहे.
भारताची कर्णधार हरमनप्रीत कौरने झेल टिपला आणि मैदानात जोरदार सेलिब्रेशन सुरु झालं. कारण भारताने फायनलमध्ये दक्षिण आफ्रिकेच्या संघाला ऑल आऊट केलं होतं. त्यामुळे भारताचे खेळाडू सेलिब्रेशन करायला लागले. सर्वांनी कर्णधार हरमनप्रीतला मिठ्या मारल्या, प्रत्येक खेळाडूच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. सर्व खेळाडू सेलिब्रेशन करत असले तरी त्यामध्ये आपल्या जखमी खेळाडूला ते विसरले नाहीत. आपल्या या जखमी खेळाडूला तेवढाच मान भारताच्या खेळाडूंनी दिल्याचे पाहायला मिळाले. भारताने वर्ल्ड कप जिंकला.



# भारताच्या वाघिनींनी विश्वचषक जिंकून इतिहास घडवला! दिला हा सर्वात मोठा संदेश

: भारताच्या लेकींनी विश्वचषक जिंकून इतिहास घडवला! वर्ल्ड कप जिंकून देशवासियांना दिला 'हा' सर्वात मोठा संदेश
नवी मुंबई : नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्पोर्ट्स ॅकडमीच्या (ऊध्र झरींळश्र डोीि -लर-वशाू) रोषणाईत, २ नोव्हेंबर (रविवार) रोजी भारतीय क्रिकेटच्या इतिहासातील एक अविस्मरणीय क्षण कोरला गेला. भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने (क्रीरपीशिर्शी घरीी) जसे नादिन डिक्लर्कची (छरवळपश वश घश्रशीज्ञ) निर्णायक झेल (उीलळलरश्र उरींलह) पकडली, त्याच क्षणी इतिहास घडला. भारतीय महिला टीमने (खपवळरप थोशप'ी ढशरा) दक्षिण आफ्रिकेला (डोीह -षीळलर) पराभूत करत पहिल्यांदाच वर्ल्ड कप विजेतेपद आपल्या नाव-ावर केले. या ऐतिहासिक विजयामुळे संपूर्ण देशाला गर्वाने भरून टाकले. मैदानावरील चाहत्यांचा प्रचंड जल्लोष आणि खेळाडूंच्या डोळ्यातील आनंदाचे अश्रू या दरम्यान, ही जीत केवळ एका खेळात मिळालेला विजय नव्हता. हा विजय दूरदर्शी नीती, प्रयत्नांची पराकाष्ठा आणि संघभावनेचा विजय होता. ५२ वर्षांच्या वर्ल्ड कप प्रवासात भारताने अखेर आपले स्थान निश्चित केले.
इउउख च्या ऐतिहासिक निर्णयाने 'समान संधी'चा मार्ग झाला मोकळा
भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (इउउख) घेतलेल्या एका दूरदर्शी आणि धाडसी धोरणाचा देखील विजय आहे. वास्तविक पाहता, ऑक्टोबर २०२२ मध्ये इउउख ने एक मोठा आणि साहसी निर्णय घेतला होता. बीसीसीआयच्या १५ व्या सर्वोच्च परिषद बैठकीत, महिला आणि पुरुष क्रिकेटपटूंना समान मॅच फी देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला होता. या निर्णयामुळे पहिल्यांदाच भारतीय महिला क्रिकेटर्सना पुरुष खेळाडूंच्या बरोबरीने मॅच फी मिळणार होती.






आर्थिक समानता (ऋळ-परपलळरश्र एर्ीींश्रळीूं) मिळाल्यानंतर, महिला खेळाडूंना प्रोत्साहन मिळाले आणि त्यांनी पूर्ण एकाग्रतेने खेळावर लक्ष केंद्रित केले, ज्याचा परिणाम वर्ल्ड कप विजयाच्या रूपात आज दिसतो आहे. हा निर्णय भारतीय महिला क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात महत्त्वाचा टर्निंग पॉईंट (ढीपळपस झेळपीं) मानला जातो.
समान वेतनाच्या निर्णयावर टीका करणाऱ्यांना महिला संघाचे सडेतोड उत्तर-समान वेतनाचा विचार न करता, त्याला वास्तविकतेत बदलणाऱ्या जगातील मोजक्याच क्रीडा बोर्डांमध्ये इउउख चा समावेश झाला. या निर्णयावर त्या वेळी काही टीकाकारांनी प्रश्नचिन्ह उभे केले होते. त्यांचे म्हणणे होते की, महिला क्रिकेट अजून पुरुष क्रिकेट इतके लोकप्रिय किंवा कमाई करणारे नाही. काही जणांनी तर या निर्णयाला आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नसून केवळ 'भावनात्मक निर्णय' असेही म्हटले होते. मात्र, इउउख चा हा निर्णय 'गेमचेंजर' ठरला. तीन वर्षांनंतर, भारतीय महिलांनी जेव्हा वर्ल्ड कप ट्रॉफी (थीश्रव उीं ढीहि) उंचावली, तेव्हा त्या सर्व टीका आणि प्रश्नांना आपोआप उत्तर मिळाले. महिलांनी त्यांच्या कामगिरीतून, समान संधी आणि समान सन्मान मिळाल्यास त्या जागतिक स्तरावर यश मिळवू शकतात, हे सिद्ध केले.
'या यशामागे दूरदृष्टीच्या धोरणांचा हात': जय शाह यांनी महिला संघाला दिले खास श्रेय
भारतीय महिला क्रिकेट संघाने आयसीसी विश्वचषक जिंकल्यानंतर, आयसीसीचे विद्यमान चेअरमन आणि माजी बीसीसीआय सचिव जय शाह (गरू डहरह) यांनी 'एक्स' पोस्टद्वारे टीमचे अभिनंदन केले आहे, परंतु त्यांच्या या विधानात केवळ शुभेच्छा नव्हत्या, तर दूरदृष्टीच्या धोरणांची झलक होती. जय शाह यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले, भारतीय महिला टीमची ही यात्रा अद्भुत राहिली आहे. खेळाडूंचा जिद्द, मेहनत आणि कौशल्य यांनी देशाला प्रेरित केले आहे. पण, आपल्याला त्या धोरणांनाही लक्षात ठेवले पाहिजे, ज्यांनी हे यश शक्य केले, वाढलेली गुंतवणूक, समान वेतन, उत्तम कोचिंग स्टाफ आणि महिला प्रीमियर लीगचा अनुभव यामुळे टीम मोठ्या आव्हानांसाठी तयार झाली. शाह यांचे हे वक्तव्य केवळ अभिनंदनपर नव्हते, तर भारतीय महिला क्रिकेटला (खपवळरप थोशप'ी उीळलज्ञशीं) एका नव्या उंचीवर नेणाऱ्या प्रशासकीय दूरदृष्टीचे स्पष्टीकरण होते.'हा विजय योगायोग नाही!' मजबूत सिस्टीम चा मोलाचा वाटा.

# दशकानंतर झाल्या भेटीगाठी:हलगरा येथे माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा



**लातूर/प्रतिनिधी** : मार्च १९९५ साली जि. प .प्रशाला हलगरा येथून दहावी उत्तीर्ण होऊन विविध क्षेत्रात कामानिमित्त वेगवेगळ्या मार्गावर गेलेल्या विद्यार्थ्यांचा तब्बल ३० वर्षांनी जुन्या आठवणींना उजाळा देणारा स्नेह मेळावा उत्साहात पार पडला .

शाळेतील संस्कारामुळेच आपण आपल्या कार्यक्षेत्रात उंच भरारी घेऊ शकलो याची आठवण ठेवून २०१९ ला समाज माध्यमाने एकत्र आलेल्या ग्रुपने आज सर्व माजी विद्यार्थी, शिकवणारे गुरुजी यांच्या साक्षीने जुन्या आठवणींना उजाळा दिला सर्वांच्या चेहऱ्यावर नव तेज दिसून आले. दिवसभर कार्यक्रम चालून सुद्धा आणखीन वेळ कमी पडला अशी भावना प्रत्येकाच्या मनात दिसून आली. संसारात गुंतलेल्या मनाला नवचेतना मिळाली. सर्वांनी आपापल्या गोड स्मृती कथन केल्या. आपल्याला ज्ञानदान करणाऱ्या गुरुजींचा सत्कार शाळेच्या गेटला दोन्ही बाजूला मुले मुली उभे राहून गुरुजीवर पुष्पवृष्टीने करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक शिंदे सर होते. प्रमुख उपस्थिती श्री सगरे वसंत, श्री मसलगे वामनराव, श्री हुलसुरे, श्री बिराजदार, श्री सूर्यवंशी यांची होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री खंदकुरे बालासाब यांनी करताना बॅचमधील विद्यार्थ्यांची यशोगाथा सांगितली. श्री बिराजदार नंदकिशोर यांनी दीर्घकाव्यातून शाळेतील गुरुजी, विद्यार्थी व विषय यांची यमक अलंकारात सुंदर गुंफण करून सर्वांचे लक्ष वेधले. श्री सतीश बंडगर यांनी पाहुण्यांना तुकाराम गाथा भेट दिली. श्री हरिराम गरुड यांनी वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह भेट दिले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्रीमती अनिता हलगरकर यांनी स्वागत गीताने पाहुण्यांचे स्वागत केले .कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पंडित पाटील, मनोहर बसवदे, भीम रोळे,अहमद मुल्ला, ब्रह्मानंद मोरे, विष्णू मोरे, श्रीहरी मोरे, सुखवास मोरे, शकुंतला गंगथडे, सुनिता बिराजदार, शीला सूर्यवंशी, अर्चना म्हैत्रे, शैला रोळे, सुनिता रोळे, सुरेखा शेळके, दिगंबर गायकवाड, अरुण पाटील, महबूब मजकुरी, मुकुंद जमादार, बालाजी मोरे, सत्यवती मुगळे, संतोष सावरे, शिवराज हत्तरगे, कनिजबी पटेल, शालू म्हैत्रे, उद्धव थोरात, पंचशीला सूर्यवंशी, बाबू सूर्यवंशी, शिंदे, चव्हाण सुनील गायकवाड, विनायक गायकवाड, रमेश गायकवाड आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री विजयकुमार वालमपले यांनी व आभार सुजाता चितकुटे यांनी मांनले दर पाच वर्षांनी सर्वांनी असेच एकत्र येण्याचे ठरवून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या शॉर्ट टर्म रिसर्च ग्रँट साठी एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयातील डॉ. स्वरा खानापुरे यांची निवड

**लातूर/प्रतिनिधी** : येथील एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयातील एम.पी.टी.एच. प्रथम वर्षातील विद्यार्थीनी डॉ. स्वरा संतोष खानापुरे यांची महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या शॉर्ट टर्म रिसर्च ग्रँट २०२४-२५ या संशोधन कार्यासाठी नुकतीच निवड झाली आहे. राज्यातील शासकीय व निमशासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांतून सदरील संशोधनासाठी ही निवड झाली आहे.

गेल्या एप्रिल २०२५ मध्ये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या वतीने शॉर्ट टर्म रिसर्च ग्रँट २०२४-२५ या संशोधन कार्यासाठी राज्यभरातील बी.पी.टी.एच. व एम.पी.टी.एच. फिजिओथेरपी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकडून प्रस्ताव मागवले होते. त्यामध्ये एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयातील २५



विद्यार्थ्यांनी संशोधन कार्यासाठी प्रस्ताव पाठवले होते. यामध्ये २५ पैकी एम.पी.टी.एच. प्रथम वर्षातील विद्यार्थीनी डॉ. स्वरा खानापुरे या विद्यार्थीनीच्या प्रस्तावाची निवड करण्यात आली आहे. यामध्ये 'फ्रोजन शोल्डर असलेल्या रुग्णांमध्ये वेदना, आरओएम आणि अपंगत्वावर स्पेन्सरच्या तंत्राचा मैटलँडच्या गतिशीलतेवर परिणाम: एक यादृच्छिक नियंत्रण चाचणी' या विषयावर डॉ. स्वरा खानापुरे संशोधन करणार आहेत.

येत्या सप्टेंबर २०२६ पर्यंत सदरील संशोधन पुर्ण करुन ते महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडे सादर करावयाचे आहे. या संशोधन कार्यासाठी एमयुएचएसकडून पाच हजार एवढे विद्यावेतन मिळणार आहे. अशा संशोधन कार्यासाठी एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयातून डॉ. स्वरा खानापुरे यांची पहिल्यांदा निवड झालेली आहे.

या निवडीबद्दल डॉ. स्वरा खानापुरे यांचे एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, प्राचार्य डॉ. सुभाष खत्री, मार्गदर्शक डॉ. गौरव भटनागर यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांतून अभिनंदन होत आहे.

## एसबीआय इंडिया इंटरनॅशनल बुलियन एक्सचेंजमध्ये विशेष श्रेणी क्लायंट म्हणून सामील

**मुंबई/प्रतिनिधी** : स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) ने शनिवारी इंडिया इंटरनॅशनल बुलियन एक्सचेंज (IIBX) लिमिटेडवर विशेष श्रेणी क्लायंट (Special Catagory Client) म्हणून आपला पहिला सोने व्यापार सुरू करण्याची घोषणा केली आहे. 'हा कार्यक्रम भारतातील बुलियन आयातीसाठी एका परिवर्तनकारी युगाची सुरुवात करतो ज्यामुळे उद्योगासाठी, विशेषत: एमएसएमई ज्वेलर्ससाठी (कार्यक्षमता, पारदर्शकता आणि सुलभता वाढते,'असे एसबीआयने एका निवेदनात म्हटले आहे. एसबीआय ही २०२४ मध्ये इंडिया इंटरनॅशनल बुलियन एक्सचेंजमध्ये ट्रेडिंग-कम-क्लीअरिंग (TCM) सदस्य बनणारी पहिली बँक होती असेही त्यात म्हटले आहे. विशेष श्रेणी क्लायंट म्हणून, एसबीआय निर्बाध बुलियन व्यवहार सुलभ करण्यासाठी, ज्वेलर्स, बुलियन डीलर्स आणि इतर भागधारकांना खखइद द्वारे सोने आयात करण्यास आणि देशभरातील मौल्यवान धातूंची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी मदत करण्यासाठी तैनात असेल असे त्यात म्हटले आहे. आयात सुलभ करण्यासाठी आणि पारंपारिक पद्धतींवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी खखइद च्या प्रगत पायाभूत सुविधांचा वापर करणार असून आयात सुलभ करण्यासाठी आणि पारंपारिक पद्धतींवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी, डइख च्या नवोन्मेष (खपर्पोरिंळेप) आणि आर्थिक समावेशनाच्या वचनबद्धतेशी हे पाऊल सुसंगत आहे, असेही आपल्या प्रसिद्धीपत्रकात एसबीआयने म्हटले आहे.

# श्री क्षेत्र कपिलधार येथे पाच नोव्हेंबरला शिवा संघटनेचा ३० वा राज्यव्यापी मेळावा

**लातूर/प्रतिनिधी** : कार्तिक शुद्ध पौर्णिमा निमित्त श्री क्षेत्र कपिलधार, ता. जि. बीड येथे शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेतर्फे यंदाही भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दिनांक ५ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ठिक ४.०० वाजता २४ वी शासकीय महापूजा आणि ३० वा राज्यव्यापी वार्षिक शिवा मेळावा संपन्न होणार आहे.संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या कार्यक्रमास महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार, मा. ना. पंकजाताई मुंडे, मा. ना. अतुल सावे, माजी मंत्री धनंजय भाऊ मुंडे, माजी विरोधी पक्षनेते विजयभाऊ वडेट्टीवार, तसेच अनेक गुरुवर्य, शिवा संघटनेचे राष्ट्रीय व राज्य पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

श्री क्षेत्र कपिलधार येथे ही परंपरा सन २००२ पासून सुरू असून संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या संजीवन समाधीवरील शासकीय महापूजा महाराष्ट्र शासनाच्या वतीने केली जाते. यापूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख आणि उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या शासकीय परंपरेची अंमलबजावणी करण्यात आली होती.या वर्षीच्या कार्यक्रमात वीरशैव लिंगायत समाजातील राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित मान्यवरांना शिवा राष्ट्रीय भूषण पुरस्कार सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ व सन्मानपत्रासह प्रदान करण्यात येणार आहे. या मेळाव्यासाठी सुमारे ५ ते ६ लाख श्रद्धालू, कार्यकर्ते आणि समाजबांधव पायी दिंड्या व वाहन रॅलीद्वारे श्री क्षेत्र कपिलधार येथे आगमन करणार आहेत. शिवा संघटनेच्यावतीने समस्त वीरशैव लिंगायत आणि बहुजन समाज बांधवांना ५ नोव्हेंबर रोजी दुपारी ठिक ४.०० वाजता होणाऱ्या या ऐतिहासिक महोत्सवात जय शिवाच्या घोषात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अशी माहिती शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात दिली आहे.

# टिपू सुलतान जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम



**लातूर/प्रतिनिधी** :टिपू सुलतान जयंतीनिमित्त यावर्षी मोफत आरोग्य तपासणी शिबीर, रक्तदान शिबीर, मनपा, उर्दु शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप, व्याख्यान, निबंध, वक्तृत्व स्पर्धा आदी उपक्रम राबवण्यात येणार आहेत. यासाठी समितीकडून जय्यत तयारी करण्यात येत असल्याची माहिती शेर ए हिंद टिपू सुलतान सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष इसरार सगरे यांनी दिली.

टिपू सुलतान जयंती सर्वसमावेश साजरी करण्यासाठी समितीची बैठक भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात झाली.यावेळी जयंती समितीचे अध्यक्ष इसरार सगरे यांनी यावर्षी राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी नूतन पदाधिकाऱ्यांचा अध्यक्ष सगरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. स्वागताध्यक्ष पप्पू धोत्रे म्हणाले की, महापुरुषांची जयंती ही सामाजिक उपक्रमांनी साजरी करण्याची परंपरा जोपासणे गरजेचे आहे. त्यामुळे यंदा विविध कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत.

सत्कार करण्यात आलेले उत्सवाचे नूतन पदाधिकारी स्वागताध्यक्ष पप्पू धोत्रे, कार्याध्यक्ष रफिक सय्यद, उपाध्यक्ष ॲड. प्रदीपसिंह गंगणे, गोविंद केंद्रे, ॲड. सुनिल कांबळे, दिनेश गोजमगुंडे, रामदास काळे, रशीद कुरेशी. मिरवणूक प्रमुख सलीम सय्यद, सचिव जुनेद आत्तार, सहसचिव इस्माईल फुलारी, कोषाध्यक्ष युसूफ शेख, प्रसिध्दी प्रमुख डॉ. ताहेर शेख, बशीर शेख, संघटक वाजिद मणियार, कायदेशीर सल्लागार ॲड. मुश्ताक सौदागर आदि उपस्थित होते.

# गरजू विद्यार्थ्यांना २.१४ लाख रुपयांची शैक्षणिक मदत:दिशा प्रतिष्ठानकडून ११ विद्यार्थ्यांना धनादेश



**लातूर/प्रतिनिधी** : शैक्षणिक शुल्क आणि साहित्याच्या वाढलेल्या किंमतीमुळे अनेक गोरगरीब व आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकांतील होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे कठीण झाले आहे. यावर मात करण्यासाठी मागील अनेक वर्षांपासून सामाजिक बांधिलकी जपत कार्य करणाऱ्या लातूर येथील दिशा प्रतिष्ठानने ११ गरजू विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रवेश शुल्काकरिता एकूण २,१४,५०० रुपयांचे भरीव आर्थिक सहाय्य केले आहे.

सध्याच्या काळात अनेक विद्यार्थी केवळ आर्थिक अडचणीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. 'एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये' या हेतूने कार्यरत असलेल्या दिशा प्रतिष्ठानने आतापर्यंत ५०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदतीचा हात दिला आहे. दहावीच्या पुढील वर्गांमध्ये ७५% पेक्षा जास्त गुण मिळालेल्या गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी ही मदत थेट त्यांच्या शाळांना जमा केली जाते.

नुकताच क्रीडा संकुल येथील मध्यवर्ती कार्यालयात आयोजित एका छोटेखानी कार्यक्रमात, प्रतिष्ठानचे मार्गदर्शक संचालक अभिजीत देशमुख, संतोष देशमुख, चाकोते अप्पा, दत्तात्रय पाटील, केऊर कामदार, रईस खान, शशी माने, संजय सूर्यवंशी यांच्या हस्ते या ११ विद्यार्थ्यांना धनादेशाचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी दिशा प्रतिष्ठानच्या या उदात्त कार्याचे कौतुक केले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष सोनू डगवाले यांनी प्रास्ताविक केले. दिशा प्रतिष्ठान मागील अनेक वर्षांपासून 'एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये' या ध्येयाने काम करत आहे. आतापर्यंत ५०० हून अधिक विद्यार्थ्यांना या प्रतिष्ठानने शिक्षणासाठी मदत केली आहे. या मदतीसाठी १० वीच्या पुढील शिक्षण घेणारे, ज्यांना ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळाले आहेत, अशा गरीब विद्यार्थ्यांची निवड केली जाते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ही आर्थिक मदत विद्यार्थ्यांच्या नावाने थेट त्यांच्या शाळेला, महाविद्यालयाला जमा करतात. पठाण मोहम्मद तलाफ फिरोज, स्वप्निल प्रशांत निंबुर्गे, अनिकेत अजय पांढरे, वडजे सार्थक दत्तात्रय,श्रावणी संभाजी खंदारे, श्रीकांत सतीश गदगे, सूर्यवंशी ओमकार विजय, गोरे अभिजीत नवनाथ, शिवम कृष्णाप्पा खडके, बालाजी चोकोटे, प्राजक्ता तानाजी बिराजदार. समाजातील शैक्षणिक प्रगतीसाठी दिशा प्रतिष्ठान सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. दिशा प्रतिष्ठान समाजातील प्रत्येक स्तरातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाची संधी पोहोचवण्यासाठी सतत प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांच्या पंखांना बळ देणे, उद्देश आहे. सोनू डगवाले, अध्यक्ष,दिशा प्रतिष्ठान. डहरीश ुळींह षरलशलेझ

या विद्यार्थ्यांना दिलेबहुजन समाज बांधवांना ५ नोव्हेंबर रोजी दुपारी ठिक ४.०० वाजता होणाऱ्या या ऐतिहासिक महोत्सवात जय शिवाच्या घोषात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अशी माहिती शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात दिली आहे.

## ४ नोव्हेंबर रोजी धाराशिव येथे संत तूकाराम महाराजांच्या ३७५ व्या स्मृती वर्षानिमित्त संस्मरणीय कार्यक्रम

धाराशिव (जिमाका) सांस्कृतिक कार्य विभाग,सांस्कृतिक कार्य संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने ४ नोव्हेबर २०२५ रोजी सायंकाळी ६:३० वाजता धाराशिव येथील बार्शी नाका येथील जिजाऊ चौकातील स्वयंवर मंगल कार्यालय येथे संत तुकाराम महाराजांच्या ३७५ व्या स्मृती वर्षानिमित्त संस्मरणीय कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

कार्यक्रमाला पालकमंत्री श्री.प्रताप सरनाईक,सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार,खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर,आमदार सर्वश्री विक्रम काळे,सतीश चव्हाण,राणाजगजितसिंह पाटील,कैलास घाडगे-पाटिल,प्रवीण स्वामी,जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,पोलीस अधीक्षक रितू खोखर यांची उपस्थिती राहणार आहे.या कार्यक्रमाला नागरिकांनी उपस्थित राहावे. असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांनी केले आहे.

## नुकसानीची पाहणीसाठी केंद्रीय पथक ४ व ५ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यात

धाराशिव (जिमाका)- सन २०२५ च्या खरीप हंगामात अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे जिल्ह्यात झालेल्या शेतपीक, शेतजमीन,रस्ते सार्वजनिक मालमत्ता व वैयक्तीक मालमत्तेच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचे पथक ४ व ५ नोव्हेंबर २०२५ रोजी केंद्रीय गृह मंत्रालयाचे सहसचिव श्री.आर.के.पांडे यांच्या नेतृत्वात जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे.

## विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग ५ नोव्हेंबर रोजी बंद राहणार

**लातूर/प्रतिनिधी** : गुरुनानक जयंतीनिमित्त शासकीय सुट्टी असल्यामुळे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग बुधवार, ५ नोव्हेंबर, २०२५ रोजी बंद राहील. तसेच गुरुवार, ६ नोव्हेंबर, २०२५ पासून शासकीय सुट्टीच्या दिवशी बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. राहूल अंभगे यांनी कळविले आहे. तसेच रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास सुरु राहील.

# बिटरगावात पूरग्रस्त कुटुंबांतील विद्यार्थांना शालेय साहित्य: कला पंढरी संस्थेकडून १३ गावातील विद्यार्थांना दिला मदतीचा हात

**रेणापूर/प्रतिनिधी** :सप्टेबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेकांच्या घरात पाणी शिरल्याने जीवनावश्यक वस्तूंचे नुकसान झाले. तसेच घरातील मुलांच्या शैक्षणिक साहित्याचेही नुकसान झाले.

या विद्यार्थांना मदतीचा हात म्हणून क्राय संस्थेच्या सहाय्याने कलापंढरी संस्थेच्या वतीने रेणापूर तालुक्यातील बिटरगाव येथील ४० विद्यार्थांना शैक्षणिक साहित्य वाटप करुन सामाजिक बांधीलकी जपली.

रेणापूर तालूक्यातील अनेक गावात सप्टेंबरमध्ये झालेल्या पावसात अनेक घरांमध्ये पाणी शिरुन अन्नधान्याबरोबर विद्यार्थांच्या शैक्षणिक नुकसान झाले होते. याची दखल घेऊन बी. पी. सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या कलापंढरी संस्थेने आंतरराष्ट्रीयस्तरावर बालकांच्या प्रश्नासाठी कार्यरत क्राय संस्थेकडे मदतीसाठी पाठपुरावा केला. क्रायकडून रेणापूर तालुक्यातील १३ गावातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. रेणापूर बाजार समितीचे संचालक अमर वाकडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहूणे म्हणून रोटरी क्लबचे विजय राठी,कलापंढरी संस्थेचे अध्यक्ष बी. पी. सुर्यवंशी,वंचित बहुजन आघाडीचे कृष्णा वाघमारे, ग्रामपंचायत सदस्या अनुसया गाडे आदींच्या हस्ते शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.या वेळी प्रदीप राठी यांनी सखोल आसे मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन सुप्रिया रामदासी यांनी केले तर आभार धनराज पवार यांनी मानले.

# वारकरी संप्रदायाचा संदेश जगभर पोहोचवणार

## सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांची घोषणा

### औशात तीन दिवसीय कीर्तन महोत्सवाचा भव्य शुभारंभ

**औसा/प्रतिनिधी :** वारकरी संप्रदायाचा विचार, भक्तीची परंपरा आणि संतांचा संदेश हा केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित राहू नये, तर तो जगभर पोहोचला पाहिजे. जगाला हेवा वाटावा, अशी ही समृद्ध परंपरा आहे, आणि या विचाराचा प्रसार करण्यासाठी राज्य शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग विविध उपक्रम राबविणार आहे, असे प्रतिपादन राज्याचे माहिती तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले.

औसा येथील श्रीनाथ मंगल कार्यालयात (दि.३) रोजी सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने आयोजित तीन दिवसीय राज्यस्तरीय कीर्तन महोत्सव कार्यक्रमाचे उद्घाटन करताना ते बोलत होते. या प्रसंगी औसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार,






नामवंत कीर्तनकार सुधाकर इंगळे महाराज,माजी नगराध्यक्ष किरण उटगे, उपसभापती भिमाशंकर राचट्टे,माजी नगराध्यक्ष संगमेश्वर ठेसे, सुभाष जाधव, सुनील उटगे,तसेच मोठ्या संख्येने नागरिक आणि वारकरी बांधव उपस्थित होते. या वेळी मंत्री शेलार म्हणाले, संत ज्ञानेश्वरांनी अवघ्या जगाच्या कल्याणाची मागणी देवाकडे केली. त्यांनी मांडलेला 'वैश्विक कल्याण' हा विचार म्हणजेच वारकरी संप्रदायाचा पाया आहे. हा विचार जगभर पोहोचवण्यासाठी संत ज्ञानेश्वरांच्या साडेसातशेवी जयंती वर्षानिमित्त परदेशातही कीर्तन, प्रवचन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. महाराष्ट्राची ओळख म्हणजे आपली संत परंपरा, ती जगासमोर आणणे ही आपली जबाबदारी आहे.

ते पुढे म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत २०४७' या संकल्पनेला अनुसरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राला विकसित राज्य बनवण्याचा संकल्प केला आहे. विकास करताना आपली ओळख, आपली संस्कृती आणि वारसा टिकवणेही तितकेच आवश्यक आहे. राज्यातील पुरातन वास्तू आणि परंपरांचे जतन करण्याचे काम सांस्कृतिक कार्य मंत्रालयाने हाती घेतले असून, महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा जगभर पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे.औसा नगरीत या महोत्सवाचे आयोजन झाल्याबद्दल आनंद व्यक्त करताना शेलार म्हणाले, औसा ही विठ्ठलभक्तीने न्हाऊन निघालेली भूमी आहे. येथे वारकरी परंपरेचा खोलवर प्रभाव आहे. अशा ठिकाणी हा कीर्तन महोत्सव होणं म्हणजे परंपरेचा सन्मान आहे.

या प्रसंगी आमदार अभिमन्यू पवार म्हणाले, औसा तालुक्याला वारकरी संप्रदायाची समृद्ध परंपरा लाभली आहे. भक्ती आणि संस्कृती यांचा संगम असलेला हा कीर्तन महोत्सव आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. हा कार्यक्रम औसा आणि परिसरातील भाविकांसाठी प्रेरणादायी ठरेल.संपूर्ण कार्यक्रमात वारकरी भाविकांचा उत्साह, संतवाणीचे वातावरण आणि भक्तीरसाने न्हालेली औसा नगरी यामुळे उद्घाटन सोहळा अत्यंत भावपूर्ण वातावरणात पार पडला.

## महालिंगआप्पा वारद यांचे दुखद निधन

**लातूर/प्रतिनिधी :** येथील रहिवासी असलेले महालिंगआप्पा मल्लिकार्जुनआप्पा वारद (९१) यांचे राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर लातूर येथील सिद्धेश्वर स्मशानभूमी येथे ०१ नोव्हेंबर रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात १ मुलगा, ३ मुली, सुन, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. उदगीर येथील आप्पा ऑटोमोबाईल्स नावाने गेली अनेक वर्ष ते व्यवसाय करीत होते. अत्यंत मनमिळाऊ स्वभावाचे असल्याचे त्यांची ओळख आहे.

## गरीब वीज ग्राहकांना २५ वर्षे मोफत वीज

### राज्य शासनाच्या स्मार्ट योजनेसाठी महावितरणचा पुढाकार

**लातूर/प्रतिनिधी :** दारिद्र्य रेषेखालील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या घरांवर एक किलोवॅट क्षमतेचा सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसवून त्यांना २५ वर्षे मोफत विजेची सुविधा उपलब्ध करण्यासाठीच्या स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप (स्मार्ट) योजनेच्या अंमलबजावणीसाठी महावितरणने पुढाकार घेतला आहे. केंद्र सरकार व राज्य सरकारच्या अनुदानामुळे या योजनेतील लाभार्थी ग्राहकांना खूप कमी हिस्सा भरावा लागणार आहे, असे महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्य सरकारने स्मार्ट योजना सुरू केली आहे. दारिद्र्य रेषेखालील १.५४ लाख तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल ३.४५ लाख अशा महिना १०० युनिटपेक्षा कमी वीज वापणाऱ्या पाच लाख घरगुती वीज ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे यासाठी ६५५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ही योजना प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्वावर राबविण्यात येणार आहे. महावितरणच्या नुकत्याच झालेल्या संचालक व मुख्य अभियंत्याच्या राज्यस्तरीय बैठकीत या योजनेच्या अंमलबजावणीबाबत सूचना देण्यात आल्या.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सुरू केली आहे. त्यामध्ये ग्राहकांना एक किलोवॅटचा छतावरील सौर ऊर्जा प्रकल्प बसविण्यासाठी ३० हजार रुपये अनुदान केंद्र सरकारकडून मिळते. स्मार्ट योजनेत या अनुदानाखेरीज राज्य सरकारकडूनही अनुदान मिळणार असल्याने वीज ग्राहकांना खूप कमी हिस्सा भरून प्रकल्प बसविता येईल.

स्मार्ट योजनेनुसार दारिद्र्यरेषेखालील ग्राहकांना एक किलोवॅटचा सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी केंद्र सरकारकडून ३० हजार रुपये तर राज्य सरकारकडून १७,५०० रुपये अनुदान मिळेल. सौर ऊर्जा प्रकल्पाची ऊर्वरित रक्कम भरून ग्राहक २५ वर्षे मोफत विजेचा लाभ घेऊ शकतो.

शंभर युनिटपेक्षा कमी वीज वापर असणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल ग्राहकांनाही केंद्र सरकारच्या ३० हजार रुपये अनुदानाखेरीज राज्य सरकारकडून अनुदान मिळणार आहे. या गटातील सर्वसाधारण ग्राहकांना दहा हजार रुपये राज्य सरकारकडून मिळतील. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या ग्राहकांना राज्य सरकार १५ हजार रुपये अनुदान देणार आहे.

एक किलोवॅटच्या सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पातून दरमहा सुमारे १२० युनिट वीजनिर्मिती होते. त्यामुळे शंभर युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना स्वतःची गरज भागवून अतिरिक्त वीज महावितरणला विकता येते. या प्रकल्पातून २५ वर्षे वीजनिर्मिती होत असल्याने तेवढा काळ लाभ होतो.

## रेणापूर मध्यम प्रकल्पातून विसर्ग सुरु; नागरीकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** रेणापूर प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रातील येणारा येवा लक्षात घेऊन पाणी पातळी नियंत्रित करण्याचे दृष्टीने आज दि. ०३/११/२०२५ रोजी ठीक १९:०० वाजता रेणापूर प्रकल्पाचे एकूण ०२ द्वार हे उघडण्यात आले असून रेणा नदीपात्रात विसर्ग करण्यात येत आहे. सद्यःस्थितीत एकूण ०२ वक्र द्वारे १० सेंटिमीटर ने उघडण्यात आली असून एकूण ६२९.२२क्यूसेक्स (१७.८२क्यूमेक्स ) इतका विसर्ग नदीपात्रात सोडण्यात येत आहे.

धरणामध्ये येणारी पाण्याची आवक पाहून विसर्ग वाढवणे/कमी करणे बाबत निर्णय घेण्यात येईल. तरी, नदी काठावरील/ पुरामुळे बाधित होणाऱ्या गावातील नागरीकांनी खबरदारी घ्यावी.

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

## प्रतिबंधित गुटख्याची अवैध विक्री करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल

## सहा लाख ३६ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

### लातूर पोलिस अधीक्षकांच्या विशेष पथकाची गांधी चौक पोलीस ठाणे हद्दीत कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटखा व पानमसाल्याची अवैध विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यावर लातूर पोलिस अधीक्षक कार्यालयाच्या विशेष पथकाने मोठी कारवाई केली असून, या कारवाईत एकूण ६,३६,१०० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्यावर कारवाई करण्यासंदर्भात पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांनी अवैध धंदे, विशेषतः प्रतिबंधित वस्तूंची विक्री, यावर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विशेष पथकाचे पोलीस उपनिरीक्षक आयुब शेख यांच्या नेतृत्वाखालील पथकाला दि. ०३ नोव्हेंबर २०२५ रोजी गोपनीय माहिती प्राप्त झाली की, गांधी चौक पोलीस ठाणे हद्दीतील गुळ मार्केट ते सम्राट चौक मार्गावर असलेल्या एका व्यापारी संकुलातील एका दुकानात प्रतिबंधित गुटखा व पानमसाल्याची अवैध विक्री सुरू आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने तत्काळ कारवाई करत छापेमारी केली असता, नितीन माणिकराव कावळे (रा. आनंदनगर, लातूर) हा व्यक्ती महाराष्ट्र शासनाने विक्री, व्यवसाय आणि सेवनासाठी बंदी घातलेल्या विविध कंपनींचा गुटखा व पानमसाला साठवून ठेवून विक्री करत असल्याचे आढळले.

या कारवाईत एकूण ३,३६,१००/- किमतीचा गुटखा व पानमसाल्याचा साठा, आणि ३,००,०००/- किमतीचे वाहन, असा एकूण ६,३६,१००/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर व्यक्तिस त्वरित अटक करून त्याच्याविरुद्ध गांधी चौक पोलीस ठाणे, लातूर येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

ही कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली विशेष पथकाचे पोलीस उपनिरीक्षक श्री. आयुब शेख यांच्या नेतृत्वात पोलीस अंमलदार युसुफ शेख, रामहरी भोसले,विशाल गुंडरे,यशवंत घुगे,नराळे, श्रेणी पो. उपनिरीक्षक सोनकांबळे, चामे यांनी केली आहे.



## नावडे ..

अंतस्थ छुपी अपेक्षा
कौतुक कुणा नावडे
विरळा एखाद कुणी
ज्यांस प्रसिद्धीवावडे

मी प्रसिद्धीपरान्मुख
म्हणू द्यावे हवे तेवढे
करावे वाटते कौतुक
माझे अस्माना एवढे

हरेक पारितोषिकाने
वळावे आमच्या कडे
मी सर्वं गुणांने संपन्न
रे बाकीचेपडे तोकडे

सरळ मार्गी आम्हीचं
कोण करणारवाकडे
पसरवा सुगंधासमान
किर्ती जिकडे तिकडे

माना वाकवून संपूर्ण
माझ्यापुढे हात जोडे
मज विरोधातबोलता
मारावे त्यालाचं जोडे

बसे मनसिंहासनावर
आग्रह तुमचा न मोडे
करालकिती उदोउदो
कौतुकआवरावे थोडे

स्तुती सुमने उधळता
मणभर अहम् रे चढे
मी माझ्यावरभाळतो
स्वतावरचं प्रेमहीजडे

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## श्री निळकंठेश्वर मंदिराच्या जतन, संवर्धनाला सर्वोतोपरी सहाय्य करणार – सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार

### मंदिर व परिसरातील बारवांना राज्य संरक्षित वास्तू घोषित करण्याचा निर्णय घेणार

**निलंगा/प्रतिनिधी :** निलंगा येथील श्री निळकंठेश्वर मंदिराचे ऐतिहासिक, पुरातन स्वरूपात जतन व संवर्धन करण्यासाठी प्रयत्न केले जातील. या कामाला भरीव निधी उपलब्ध करून देण्यासह मंदिर व परिसरातील बारवांना राज्य संरक्षित वास्तू घोषित करण्याचा निर्णय घेतला जाईल, असे राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले. श्री नीलकंठेश्वर मंदिर व परिसराच्या पाहणीनंतर ते बोलत होते.

यावेळी त्यांनी श्री निळकंठेश्वर महाआरतीस उपस्थिती लावली. आमदार संभाजी पाटील निलंगेकर, पुरातत्व विभागाचे संचालक तेजस गर्गे, तांत्रिक सल्लागार तेजस्विनी आफळे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे, अरविंद पाटील निलंगेकर, अजित पाटील कव्हेकर, लिंबन महाराज रेशमे यांच्यासह श्री निळकंठेश्वर मंदिर विश्वस्त,



पदाधिकारी, नागरिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपला महाराष्ट्र सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध आहे. आपल्या संस्कृतीचे जतन करत राज्याचा विकास करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. राज्यातील सर्वच पुरातन मंदिरांचे जतन व संवर्धन करण्यात येणार असून यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. श्री नीलकंठेश्वर मंदिरासह बारवांच्या संवर्धनासाठी आवश्यक निधी देण्यात येईल. या मंदिराचा व परिसराचा सांस्कृतिक, पुरातन ठेवा जपण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले जातील. या परिसराला राज्य संरक्षित वास्तू घोषित करण्याचा निर्णय घेण्यात येईल, असे ॲड. शेलार यांनी सांगितले.आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी श्री निळकंठेश्वर मंदिराच्या ऐतिहासिक व पुरातन वारसा यावेळी सांगितला. तसेच या मंदिराच्या जतन व संवर्धनाच्या कामांना भरीव निधी देण्याची विनंती त्यांनी यावेळी केली.

तांत्रिक सल्लागार तेजस्विनी आफळे यांनी मंदिराच्या जतन व संवर्धनासाठी आवश्यक कामांची माहिती दिली. प्रा . दत्ता शाहीर यांनीही यावेळी मंदिराविषयी माहिती देत मंदिराच्या जतन, संवर्धनाची गरज विषद केली. सूत्रसंचालन शैलेश गोजमगुंडे यांनी केले. माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६